| २९.०७.२०२४ | सन २०१९ ते २०२२ या कालावधीतील माहिती अधिकार अधिनियम ७(१) अन्वये ४८ तासांच्या आत मा. नायब तहसिलदार पाटोदा यांच्या न्यायालयाने दि.१८.०६.२०१९ रोजी दिलेल्या संचिका क्र.२०१९/जमाबंदी-२ आरओआर/कावि-१२७/१९ निर्णयानुसार सदरील मौजे पिठ्ठी ता. पाटोदा येथील यैथील तक्रारी फेरफार क्र.१४४१ संदर्भात मा. साहेबांनी दिलेल्या निकालाच्या संचीकेसाठी पुरावा म्हणून दाखल केलेल्या कागदपत्राची संपूर्ण संचिकेची जन माहिती अधिकारी यांच्या स्वाक्षरीनिशी प्रत मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी कोणतीच माहिती दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती

अर्जाच्या अनुषंगाने त्यांना कार्यालयीन दिवशी अवलोकनासाठी उपस्थित राहून माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत कळविले होते.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, संबंधित विभागने माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जानुसार आवश्यक असलेली माहिती सत्वर प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातून तहसिलदार, तहसिल कार्यालय, पाटोदा, जि. बीड यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, पाटोदा, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीचा कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन शोध घ्यावा. अशी कार्यवाही करताना रोजनामा ठेवण्यात येऊन दैनंदिन कामकाजाची नोंद त्यात घेण्यात यावी. या कार्यवाहीदरम्यान उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अशी कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात पूर्ण करावी व या कार्यवाहीचा अंतिम निष्कर्ष अपिलार्थी यांना कळविण्यात यावा.

२. वर नमूद केल्याप्रमाणे शोध घेऊन माहिती उपलब्ध न झाल्यास अशा माहिती संदर्भातील अभिलेख जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द **(अभिलेखाचा जतन कालावधी विचारात घेऊन)** तहसिलदार, अपर तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार एफआयआर दाखल करावा, अशी त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशांसह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.**------589------ **दिनांक :**---16/1/26---

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०१६२/२०२५**
**बोर्ड क्र.०७**

श्री. महावीर नानाभाऊ मांडवे, — अपिलार्थी
रा. स्वराज्य नगर, बार्शी रोड, बीड,
ता.जि. बीड-४३११२२.
मो. नंबर-९४२०५७९६३६ / ९७६५९८४५२८

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप विभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि०९.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०९.२०२५ | आपल्या कार्यालयातील निर्गमीत केलेल्या धरणग्रस्त प्रमाणपत्र क्र.८५/पुनर्वसन-३/सीआर/७३९ जिल्हाधिकारी कार्यालय (पुनर्वसन शाखा) बीड दि.२७.०६.१९८५ धरणग्रस्त प्रमाणपत्र संचिका व तसेच क्र.९० पुनर्वसन ४/८४५ जिल्हाधिकारी कार्यालय (पुनर्वसन शाखा), बीड दि.१४.०९.१९९० धरणग्रस्त प्रमाणपत्र संचिका मौजे मसेवाडी ता.जि. बीड येथील ९७ ते १०१ सामाईक सर्व्हे नं.१०५/५ लघुसिंचचन तलाव मसेवाडी ता.जि.बीड जमीन मयत नामे नाना रामा मांडवे यं ाचे नावे संपादित झालेली असून महावीर नाना मांडवे यांचे नावे मिळालेले धरणग्रस्त प्रमाणपत्र मुळ संचिकेतील कागदपत्रे व माहिती यांच्या प्रमाणीत प्रती देण्यात याव्यात. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपिलाप्रमाणे कुठलीही दखल घेण्यात आलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. अपिलार्थी यांना माहितीचे अवलोकन देऊन माहिती देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे..

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,उपविभागीय अधिकारी कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलाथी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. उप विभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-----585----- दिनांक :-16/1/26-----

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०१६३/२०२५**
**बोर्ड क्र.०८**

श्री. महावीर नानाभाऊ मांडवे, — अपिलार्थी
रा. स्वराज्य नगर, बार्शी रोड, ता.जि.बीड-४३११२२
मो. नंबर-९४२०५७९६३६ / ९७६५९८४५२८

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार, साप्र-२,
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
सर्वसाधारण, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, नायब तहसिलदार, साप्र-२, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड, श्री. रामदास अं. बोठे व प्रथम अपिलीय अधिकारी, श्रीमती कविता जाधव, उपविभागीय अधिकारी, बीड व श्री. विनोद सुभाष रनवरे, तहसिलदार, बीड उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०९.२०२४ | आपल्या कार्यालयातील निर्गमीत केलेल्या धरणग्रस्त प्रमाणपत्र क्र.८५/पुनर्वसन-३/सीआर/७३९ जिल्हाधिकारी कार्यालयात (पुनर्वसन शाखा) बीड दि.२७.०६.१९८५ धरणग्रस्त प्रमाणपत्र संचिका व तसेच क्र.९० पुनर्वसन४/८५ जिल्हाधिकारी कार्यालय कार्यालय पुनर्वसन शाखा, बीड दि.१४.०९.१९९० धरणग्रस्त प्रमाणपत्र संचिका मौजे मसेवाडी, ता. जि. बीड येथील ९७ ते १०१ सामाईक सर्व्हे नं.१०५/५ लघुसिंचन तलाव मसेवाडी, ता.जि. बीड जमीन मयत नाते नाना रामाम मांडवे यांचे नावे संपादित झालेली असून महावीर नाना मांडवे यांचे नावे मिळालेले धरणग्रस्त प्रमाणपत्र मुळ संचिकेतील कागदपत्रे व माहिती यांच्या प्रमाणीत प्रती देण्यात याव्यात. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, मी सध्या नविन आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२६.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, बीड यांनी संबंधीत अर्जदार यांना त्यांचे सोईनुसार दिनांक व वेळ (कोर्यालयीन कामकाजातील) देऊन पुनर्वसन शाखेतील अभिलेख स्वत: पाहण्यासाठी देण्यात यावा व संचिका उपलब्ध झाल्यास त्यांना आवश्यक कागदपत्रे देण्यात यावेत असा आदेश पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशाप्रमाणे कुठलीही दखत घेण्यात आली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही, बाबीची आयोगाने गंभीर दखल घेतलेली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, साप्र-२, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, साप्र-२, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२४.०२.२०२६ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. तहसिलदार,सर्वसाधारण, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18291 दिनांक :- 26/12/2025

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०२४६/२०२५**
**बोर्ड क्र.०९**

श्री. मोहम्मद अनवरुल्ला म.अ. रशीद, — अपिलार्थी
रा. जहांगीर सिटी, तेलगांव रोड, बीड, ता.जि. बीड.
मो. नंबर-९४२१२६५७८६

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (सा-१),
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार (सर्वसामान्य),
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१६.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.०८.२०२४ | सन २०१० ते २०१६-१७ या कालावधीतील अल्पसंख्याक पायाभूत अनुदान प्रस्तावाबाबत माहिती मिळणे.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०३.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, अल्पसंख्याक विभागामध्ये उपलब्ध अभिलेखाची पाहणी केली असता आपणास आवश्यक असलेली माहितीची अभिलेखे उपलब्ध नाहीत असे कळविण्यात आलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०६.०१.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारी व अपेक्षीत माहिती न दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना माहिती / माहितीची वस्तुस्थिती अवगत केल्याचे दिसून येत आहे. या ठिकाणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 586 दिनांक : 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०४२०/२०२५**
**बोर्ड क्र.१०**

श्री. काळे जयराम दादाराव, — अपिलार्थी
रा. जाधव निवास, जिजामाता चौक, मोढा रोड, बीड-४३११२२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
महसूल-०२ (आस्थापना-०१), जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार (महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.११.२०२४ | भ्रष्टाचार निर्मलन समिती जिल्हाधिकारी कार्यालय, बीड समक्ष अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क यांचेवर देशी दारु CL3 बिअरशापी व FL2 CL3 प्रकरणात पैसे मागणी केल्याची तक्रार दिली आहे, त्यावर काय कार्यवाही केली त्याची लेखी स्वरुपात माहिती दयावी ही विनंती तसेच इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०९.१२.२०२४ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन संचिका बंद करावी असे लिहून दिलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१०.०१.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती

मिळाल्याचे निष्पन्न होते, त्यामुळे अपिलार्थीचे अपिल नामंजूर करण्यात येते, असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, समाधान कारक कार्यवाही नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०९.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती पाठविलेली आहे. या ठिकाणी जन माहिती अधिकारी यांनी देय होणारी माहिती दिलेली आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद व कागदपत्रे विचारात घेता अपिलार्थी यांचे द्वितीय निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---582--- दिनांक :-16/1/26---

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०४७५/२०२५**
**बोर्ड क्र.११**

श्री. केशव मनोहर आबुज, — अपिलार्थी
मु. पो. सिंधफना चिंचोली,
ता. गेवराई, जि. बीड-४३११२७

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार, साप्र-२,
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार, सर्वसाधारण,
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०९.२०२४ ऑनलाईन | सिंधफना चिंचोली ग्रामपंचायत क्षेत्रातील पुनर्वसन अंतर्गत सन २०२४ पर्यंत नागरिकांना वाटप करण्यात आलेल्या रहिवाशी भूखंड सनदेची प्रत मिळावी, नव्याने गायरान / रहिवाशी क्षेत्रातील शासकीय मालकीची भूखंड रहिवाशी वापरासाठी मिळवण्याची प्रक्रिया कळावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही ऑनलाईन संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसे अपिलार्थी यांना दि.०४.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना संकेतस्थळ कळविण्यात आलेली आहे. जी माहिती संकेतस्थळवर उपलबध आहे ती नव्याने प्रिंट काढून देणे अपेक्षीत नाही. या ठिकाणी जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.----588---- दिनांक :----16/1/26----

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०७३५/२०२५**
**बोर्ड क्र.१२**

श्री. प्रदिप दिनकर औसरमल, अपिलार्थी
रा. पंचशिल नगर, ता.जि. बीड.
मोबाईल नंबर-९१६६७८२७९८

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
भूसंपादन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपजिल्हाधिकारी,
भूसंपादन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ बृहन्मुंबई यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलाचे कार्यक्षेत्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे असल्याने दि.०४.०२.२०२५ रोजी वर्ग केलेले आहे. या कार्यालयास दि.१७.०२.२०२५ रोजी प्राप्त झालेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३१.०७.२०२३ | सन २००५ ते २०२३ या कालावधीतील गट नं.१७३,१७४ रेल्वे भूसंपादन नकाशा व मोजणी अहवाल निविदा अवार्डची नक्कला मिळणेबाबत. (पिंपर गव्हाण) |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनावरुन त्यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा भूसंपादन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपजिल्हाधिकारी, भूसंपादन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र. 589 दिनांक : 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०८३५/२०२५**
**बोर्ड क्र.१३**

श्री. मुस्ताक अब्दुल बाखी कुरेशी, — अपिलार्थी
रा. महेबुब नगर, माजलगांव,
ता. माजलगांव, जि. बीड.
मो. नंबर-९९६०६०९४६६

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगरपरिषद प्रशासन विभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा प्रशासन अधिकारी,
नगर विकास विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, स्थापत्य अभियंता, उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०९.२०२४ | दि.०१ जानेवारी २०२१ ते माहिती देय दिनांकापर्यंत या कालावधीतील आपण माजलगांव नगर परिषद मुख्याधिकारी यांच्यावर दप्पर दिरंगाई अंतर्गत कार्यवाही केलेला अहवाल सत्यप्रतीत देण्यात यावा. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२३.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये देय होणारी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये माहिती दिल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

**जा.क्र.**- 590 - **दिनांक :**- 16/1/26 -

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक १८२९/२०२५ व १८३०/२०२५**
**बोर्ड क्र.१४ व १५**

श्री. मुजीबोद्दीन हमीदोद्दीन काझी, — अपिलार्थी
रा. मोहम्मदीया कॉलनी,
फुलवाली मस्जीद जवळ, अंबाजोगाई,
जि. बीड-४३१७५१७. मो. नंबर-८०८७५६२८७५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार, सा-१,
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
सर्वसाधारण, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु.बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| १४ | १८२९/२०२५ | २०.०१.२०२५ | मराठवाडा एज्युकेशन एंड वेल्फेअर सोसायटी परळी वै., जि. बीड द्वारा संचलित फारुकी उर्दू प्राथमिक शाळा परळी वै.जिज. बीड या शाळेला महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभागातून प्राप्त निधीची वर्षनिहाय तपशील खर्च निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र प्रत, खरेदी केलेल्या वसतूंचे बिलाची प्रत सह. माहिती कार्यालयीन साक्षांकित प्रत या माहिती अधिकार कायदयाअंतर्गत |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पुरविण्यात यावी. |
| १५ | १८३०/२०२५ | २०.०१.२०२५ | अल्पसंख्याक शाळांमध्ये पायाभूत सुविधा अनुदानबाबत माहिती मिळणे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०८.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, सकिंर्ण विभागातील उपलब्ध अभिलेखाची तपासणी केली असता सदर अभिलेख आढळून आले नाहीत असे सविस्तर पणे अपिलार्थी यांना व्यक्तिश: स्वीकारुन पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दोन्ही माहिती अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी माहिती परिपुर्ण उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दोन्ही प्रथम अपिलावर दि.२४.०३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांनी मागणी केलेली माहिती तात्काळ उपलब्ध करुन दयावी, असा निर्णय पारित केल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कारवाई केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी यांचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या उक्त नमूद निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, सा-१, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (वर नमूद केल्याप्रमाणे) आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. तहसिलदार, सर्वसाधारण, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

प्रकाश

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र.----591---- दिनांक :-16/1/26----

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १९१२/२०२५**
**बोर्ड क्र.१६**

श्री. रोहीदास पि. देवराव येवले, — अपिलार्थी
रा. श्रृंगेरी निवास, तुळजाई नगर, ग्रामसेवक कॉलनी, नगर रोड,बीड, ता.जि. बीड. मो. नंबर-९४२१३४३५०४

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सहायकद महसूल अधिकारी,
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), ल.पा. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), ल.पा. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. (तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वाक्षरीचा रोजनामा सादर केलेला नाही.)

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १७.०१.२०२५ | दि.११.०३.२०२४ ते आजपर्यंत या कालावधीतील गाव तलाव, धोपट वाडर (संचीका क्र.१०/९८) मधील १, अवार्ड २. स्टेटमेंट ई ३. सी सी फॉर्म्स, ४. नक्कलासाठी जिल्हाधिकारी कार्यालय (अभिलेख शाखा) बीड यांनी केलेला पत्रव्यवहार व केलेल्या कार्यवाहीचा तपशिल मागितलेला आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला अर्धवट माहिती दिलेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती परिपुर्ण उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, कार्यालयात उपलब्ध

असलेली माहिती देण्यात आलेली आहे. काही माहितीचा शोध घेणे सुरु आहे. उपलब्ध होताच अपिलार्थी यांना देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कसलीही माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती अर्धवट मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना परिपुर्ण माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे त्यांच्या युक्तिवादात व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जानुसार आवश्यक असलेली माहिती सत्वर प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातून उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), ल.पा. बीड यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), ल.पा. बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीचा कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन शोध घ्यावा. अशी कार्यवाही करताना रोजनामा ठेवण्यात येऊन दैनंदिन कामकाजाची नोंद त्यात घेण्यात यावी. या कार्यवाहीदरम्यान उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अशी कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात पूर्ण करावी व या कार्यवाहीचा अंतिम निष्कर्ष अपिलार्थी यांना कळविण्यात यावा.

२. वर नमूद केल्याप्रमाणे शोध घेऊन माहिती उपलब्ध न झाल्यास अशा माहिती संदर्भातील अभिलेख जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द **(अभिलेखाचा जतन कालावधी विचारात घेऊन)** जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार एफआयआर दाखल करावा, अशी त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.-----592----- दिनांक :-16/1/26----- नोंदणीकृत टपालाद्वारे

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २१०४/२०२५**
**बोर्ड क्र.१७**

श्री. देवीदास जिवाजी गुंड, — अपिलार्थी
मु. पो. वाघळुज, ता. आष्टी, जि. बीड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार महसूल-२,
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार (महसूल) जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.०१.२०२५ | सन २०२४ ते आजतागायत या कालावधीतील अर्जदार यांनी दि.२५.११.२०२४ रोजी मा.जिल्हाधिकारी,बीड यांना दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबत माहिती व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन दि.१२.१२.२०२५ रोजी पोहच दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०७.०३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणात अंतिम निर्णय झाल्यानंतर शासन नियमानुसार/ तरतुदीनुसार देय असणारी माहिती संबंधीतास पुरवावी, असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्यें, मुदतीत माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलबध करुन दिल्याचे दिसून येत आहे. या ठिकाणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र.: 593 दिनांक : 16/1/26

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४३८३/२०२५**
**बोर्ड क्र.१८**

श्री. मनोजकुमार रावसाहेब चंदनशिव, ... अपिलार्थी
रा. भोपला, पो. बोरगाव (बु.),
ता. केज, जि. बीड-४३१ १२३,
मोबाईल नंबर-७९७२६१०७२६.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा ... उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (सा-१),
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा ... : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार (सर्वसाधारण),
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०९.२०२५ रोजी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच, आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.०३.२०२५ | दि.०१ ऑगस्ट २०२४ या कालावधीतील आपल्या आलेल्या उत्तरानुसार मी माहिती अधिकारा खालील केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी कनिष्ठ प्रशासन अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, बीड यांनी दिलेल्या उत्तरास अनुसरुन व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आमच्या विभागाशी संबंधीत नसल्यामुळे जिल्हा परिषदेकडे वर्ग केलेला आहे. संबंधीत विभागाने अपिलार्थी यांना दि.०१.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध सहपत्रासहित देण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती / माहितीची वस्तुस्थिती अवगत केल्याचे दिसून येत आहे. या ठिकाणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 594 दिनांक : 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४९१४/२०२५**
**बोर्ड क्र.१९**

श्री. सिध्देश्वर महादेव मुंडे,
रा. शिवाजी धोंडे नगर, बीड.
मो. नंबर-९४२२६०६३५७. — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार,
सामान्य प्रशासन-२, जिल्हाधिकारी कायर्यालय, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार, सर्वसाधारण,
जिल्हाधिकारी कायर्यालय, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०६.२०२५ | कार्यालयीन खर्चाच्या देयकांच्या साक्षांकित प्रती मिळाव्यात, श्री. स्वामी साहेब निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या आजपर्यंतच्या कार्यकालावधीत कार्यालयीन खर्चासाठी जी देयके दिली आहेत, त्या सर्व देयकांच्या साक्षांकित प्रती मिळाव्यात. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने त्यांना कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे अवलोकन करुन शासकिस फिस भरल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येईल असे दि.२१.०७.२०२५ व २८.०८.२०२५ असे दोन वेळेस कळविण्यात आले होते. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२०.०८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना अवालेकन करुन चिन्हांकित केलेली माहिती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार शासकिय चलन भरुन घेऊन पुरवावी असा आदेश पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ करत आहेत, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी विस्तृत मोघम स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. या ठिकाणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय योग्य दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. ५९५ दिनांक : 16/1/26

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १९१५/२०२५**
**बोर्ड क्र.२०**

श्री. अविनाश शिवाजी डोईफोडे, — अपिलार्थी
रा. शिरुर (घाट), ता. केज, जि. बीड.
मो. नंबर-९८८१५४५३५०.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (सा.प्र.-२), लेखा विभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार सर्वसाधारण,
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०६.२०२५ | निवासी उपजिल्हाधिकारी श्री. स्वामी साहेब यांच्या कालावधीतील टोकन रजिस्टरच्या प्रमाणित प्रती मला देण्यात यावे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने त्यांना कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे अवलोकन करुन शासकिस फिस भरल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येईल असे दि.२२.०७.२०२५ व दि.०८.०८.२०२५ असे दोन वेळेस कळविण्यात आले होते. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२८.०८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना

कार्यालयीन वेळेत अवालेकनाची संधी दयावी व त्यांनी चिन्हांकित केलेली माहिती, "माहिती अधिकार अधिनियम २००५" मधील तरतुदीनुसार शासकिय शुल्क भरल्यानंतर उपलब्ध करुन दयावी, असा आदेश पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळत आहेत, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी विस्तृत मोघम स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. या ठिकाणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय योग्य दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.----596---------- दिनांक :--16/1/26------

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०३४०/२०२५**
**बोर्ड क्र.२१**

श्री. गणेश संजय पोकळे, — अपिलार्थी
रा. दादेगांव, ता. आष्टी, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप विभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाटोदा, जि.बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.०९.२०२४ | सन १९८८ या कालावधीतील प्रकल्प ग्रस्त प्रमाणपत्र संचिका क्रमांक ४९६९/पु/३/W.S/५७५० प्रमाणपत्राचा अनुक्रमांक ६६९/८८ प्रमाणपत्र धारकाचे नाव-विजय बाबुराव पोकळे या प्रमाणे असून मी या अर्जाद्वारे संपूर्ण संचिकेची नक्कल मागणी करीत आहे ती तात्काळ देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा शोध चालू असून संचिका आढळून येताच आपणास माहिती पुरविण्यात येईल असे कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाटोदा, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उप विभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाटोदा, जि.बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 597 दिनांक : 16/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १३६८/२०२५ व १३६९/२०२५**
**बोर्ड क्र.२२ व २३**

डॉ. उध्दव भाऊसाहेब कुडके, — अपिलार्थी
रा. पिठ्ठल, ता. पाटोदा, जि. बीड.
मो. नंबर-९४२१२७०५००.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
तलाठी,
तलाठी सज्जा नायगांव, ता. पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, पाटोदा, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहिलीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. डि.बी. निलावाड, तहसिलदार, पाटोदा उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|---|
| २२ | १३६८/२०२५ | २६.१२.२०२४ | सन २०२३-२०२४ या कालावधीतील माहिती अधिकार २००५ कलम ७(१) अन्वये ४८ तासांच्या आत नायगाव |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सज्जा ता. पाटोदा अंतर्गत पिठ्ठल गावातील सन १ जानेवारी २०२३ पासून आपजर्यंत मा. मंडळ अधिकारी श्री. संतोष हांगे साहेबांनी स्वत:च्या LOGING ला मा. तलाठी साहेबांनी मंजूरीसाठी सादर केलेले फेरफार सादर केलेल्या दिवसापासून किती दिवसात मंजूर केले त्या फेरफारच्या प्रतीची जन माहिती अधिकारी यांचया स्वाक्षरीनिशि ी माहिती मिळणेबाबत व इतर.. |
| २३ | १३६९/२०२५ | २६.१२.२०२४ | सन २०२३-२०२४ या कालावधीतील माहिती अधिकार २००५ कलम३ ७(१) अन्वये ४८ तासांच्या आत नायगाव सज्जा ता. पाटोदा अंतर्गत पिठ्ठी गावातील सन ०१ जानेवारी २०२३ पासून आजपर्यंत मा.तलाठी साहेबांनी फेरफार दस्त नोंदणी करण्यासाठी अर्जदाराने सादर केलेल्या अर्जानंतर नोंदीच्या प्रती व अर्जदाराने सादर केलेल्या अर्जाच्या प्रतीची जन माहिती अधिकारी यांच्या स्वाक्षरीनिशी माहिती मिळणेबाबत व इतर.. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणी दरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणीसाठी नोटीस पाठविली असता, सदर अपिलार्थी यांनी दिलेल्या पत्यावर राहत नसल्यामुळे नोटीस कार्यालयास परत आलेली आहे. त्यामुळे प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी व्दितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी सज्जा नायगांव, ता. पाटोदा, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी सज्जा नायगांव, ता. पाटोदा, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द

अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२४.०२.२०६ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. तहसिलदार तहसिल कार्यालय, पाटोदा, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18196 दिनांक : 24.12.2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १५०८/२०२५**
**बोर्ड क्र.२४**

श्री. सुभाष मोहनरव हुंबरे, — अपिलार्थी
रा. तुळजाई डेव्हेलोपर्स, आदित्य आर्कड,
न्यु वैशाली लाईट हाऊसच्या मागे, पांगरी रोड, बीड-४३११२२.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
उपविभागीय अधिकारी भूसंपादन,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अधिकारी, पाटोदा, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१६.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या दि.२८.१०.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाव्दारे हवी असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना व्यक्तिश: उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी प्राप्त करुन घेऊन दि.०७.०५.२०२५ रोजी उपविभागीय अधिकारी, कार्यालय, पाटोदा, जि. बीड यांना उद्देशुन लेखी निवेदन दिलेले आहे. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी, माहिती मिळाली असल्याचे व मिळालेल्या माहितीबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद व अपिलार्थी यांचे लेखी निवेदन विचारात घेता, अपिलार्थी यांची विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपिलार्थी यांची व्दितीय अपी निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.------ 598 ------ दिनांक :------ 16/1/26 ------ ग

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २६११/२०२५**
**बोर्ड क्र.२५**

श्री. अजीम बादशहा सय्यद, — अपिलार्थी
मु. पो. कुकाणा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर-४१४६०४,
मो. नंबर-९९२२२०७५३७

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार, तहसिल कार्यालय, पाटोदा, जि.बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२५.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या दि.२४.०२.२०२५ रोजीच्या माहिती अर्जाव्दारे हवी असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना व्यक्तिशः उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी प्राप्त करुन घेऊन दि.११.१२.२०२५ रोजी मा. राज्य माहिती आयुक्त साहेब यांना उद्देशुन लेखी निवेदन दिलेले आहे. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी, माहिती मिळाली असल्याचे व मिळालेल्या माहितीबाबत काहीही तक्रार राहिलेली नाही, माझा अर्ज मागे घेत आहे, असे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद व अपिलार्थी यांचे लेखी निवेदन विचारात घेता, अपिलार्थी यांची विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपिलार्थी यांची व्दितीय अपी निकाली काढण्यात येत आहे.

प्र श्रा इं

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र.------ 599 दिनांक :------ 16/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३१९३/२०२५**
**बोर्ड क्र.२६**

श्री. आरुण सुवालाल कांकरिया, — अपिलार्थी
मु. पो. पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड-४१४२०४.
मो. नंबर-९४०५८७४३४२.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार, तहसिल कार्यालय, पाटोदा, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१६.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.०३.२०२५ | दि.३१.१२.१९७५ ते दि.३१.१२.२००५ पर्यंत या कालावधीतील स्वस्त धान्य दुकान, रॉकेल लेव्ही साखर ठोक व किरकोळ परवाने नोंदवहीच्या पा न क्रं.०१ ते शेवटच्या पानाची सत्यप्रत माहिती व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती मोठया कालावधीची असल्याने अर्जदार यांना महिती मुदतीत देता आली नसल्याचे प्रथम अपिल सुनावणीच्यावेळी सांगितलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२०.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, उपलब्ध नसल्याने अपिलार्थी यांना देता येत नाही, करिता अपिलार्थी यांचा अर्ज निकाली काढलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, विहित मुदतीत माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, उपलब्ध नसल्याने अपिलार्थी यांना देता येत नाही, करिता अपिलार्थी यांचा अर्ज निकाली काढले असा निर्णय दि.२०.०६.२०२५ रोजी पारित केल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या उक्त नमूद निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 600 दिनांक : 16/1/26

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ३६४४/२०२५**
**बोर्ड क्र.२७**

श्री. रामेश्वर जयसिंगराव जाधव, — अपिलार्थी
मु. पो. पाटीलगल्ली, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड.
मो. नंबर-९६०४३१०५९९.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार, तहसिल कार्यालय, पाटोदा, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व त्यांचे विधिज्ञ उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.०४.२०२५ | १२९१ फसली ते सन २०२५ पर्यंत या कालावधीतील आमच्या कुटूंबाच्या मालकीची पाटोदा येथील सर्वे नं.७१३ संबंधित पाहणी पत्रक व जमाबंदी सन १२९१ मध्ये मध्ये क्षेत्र १९एकर दाखविलेले आहे त्याची माहिती मिळणेबाबत व इतर०६ मुद्याबाबत.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी व विधीज्ञ यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान व जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत व विविध स्वरुपाची माहिती असून आपणास नेमकी कोणती माहिती आवश्यक आहे याचा बोध होत नाही. तरी आपण कार्यालयीन वेळेत तहसिल कार्यालय, पाटोदा येथे हजर राहून आपणास

आवश्यक माहिती प्राप्त करुन घ्यावी असे दि.०५.०५.२०२५ रोजीच्यापत्रान्वये कळविण्यात आले. सदर व्यक्तीच्या पत्यावर गेले असता व्यक्ती आढळून आला नाही, असा गोषवारा संबंधितानी दिलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत व बोध न होणारी माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. तसेच अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये व्यक्तीश: माहितीची मागणी केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहितीचे अवलोकनासाठी बोलविले असता अपिलार्थी कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे अवलोकन केलेले नाहीत. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 601 दिनांक : 16/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३७७७/२०२५**
**बोर्ड क्र.२८**

श्री. सुहास दिनकरराव जाधव, — अपिलार्थी
रा. पाटील गल्ली पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड-४१४२०४.
मो. नंबर ७५८८५९६७७९.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, पाटोदा, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.०८.२०२४रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २७.०३.२०२५ | दि.०१.०१.२०१५ पासून ते दि.२७.०३.२०२५ पर्यंत या कालावधीतील पाटोदा तालुक्यामध्ये खडी क्रेशर चालवण्यासाठी दिलेल्या परवानग्या तसेच खडी क्रेशर चालवण्यासाठी अटी व शतीच्या माहितीबाबत व इतर .. ८ मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती मोठया स्वरुपाची आहे. काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती मोघम व विस्तृत माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 602 दिनांक : 16/1/26

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४००५/२०२५ व ४३३५/२०२५**
**बोर्ड क्र.२९ व ३१**

श्री. भानुदास शिवाजी जेवे, — अपिलार्थी
रा. प्लॉट नं.६९, अनुग्रह जबिंद बंगलो शेजारी,
देवगिरी दर्गा रोड, छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक महसूल अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाटोदा, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२९.०८.२०२५ व दि.१९.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलांची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय / तपशिल |
|---|---|---|---|
| २९ | ४००५/२०२५ | २३.०४.२०२५ ऑनलाईन | विशेष भूसंपादन क्र.०२, बीड यांनी मौजे खडकत ता. आष्टी जि. बीड येथील पाझर तलावासाठी भूमी संपादन अधिनियम |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | १८९४ (सन १८९४ चा १) यांच्या कलम ४(१) अन्वये काढलेल्या अधिसूचना कलम ४९ दि.०४.१२.१९८२ ची मागणित प्रत मिळावी. |
| ३१ | ४३३५/२०२५ | ऑनलाईन | मौजे खडकत ता. आष्टी, जि. बीड येथील गट क्रमांक ४२८ मधील खाते क्रमांक ११९७१ मधील महाराष्ट्र शासन पाझर तलावाच्या संबंधित उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) बीड क्र. -२ यांचेकडील केस नं.८७/LNQ/CR/४७ दि.१९.१०.१९९१ च्या साक्षांकित प्रती देण्यात याव्यात. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महसूल अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाटोदा, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या दोन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक महसूल अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाटोदा, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२४.०२.२०२६ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाटोदा, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. जिल्हाधिकारी, जिल्हीधिकारी कार्यालय, बीड यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. जिल्हाधिकारी, जिल्हीधिकारी कार्यालय, बीड यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र.---18197--------------- दिनांक :-24.12.2025--- नोंदणीकृत टपालाद्वारे

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जिल्हाधिकारी, जिल्हीधिकारी कार्यालय, बीड

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४१००६/२०२५**
**बोर्ड क्र.३०**

श्री. भानुदास शिवाजी जेवे, — अपिलार्थी
रा. प्लॉट क्र.६९, अनुग्रह जबिंद बंगलो शेजारी,
देवनागरी दर्गा रोड, छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,म-१,
तहसिल कार्यालय, आष्टी, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, आष्टी, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१६.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १६.०५.२०२५ | मौजे खडकत ता. आष्टी, जि. बीड या गावातील फेरफार क्र.२६९५ च्या संबंधित तहसिल कार्यालय आष्टी यांचे पत्र क्रमांक २०१२/जमा-१/कावि/१०६८ दि.२७.०७.२०१२ ची साक्षांकित प्रत देण्यात यावी २. मौजे खडकत ता. आष्टी जि. बीड या गावातील फेरफार क्र.२६९५ च्या संबंधित उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) बीड क्र.२ यांचे केस नं.८७/LNQ/४७ दि.१९.१०.१९९१ च्या साक्षांकित प्रती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, या प्रकरणात नोटीस प्राप्त झालेली नाही. त्यामुळे या प्रकरणाच्या अनुषंगाने काहीही कागदपत्रे सोबत आणले नाहीत. काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणताही प्रतिसाद/ निर्णय मिळाला नाही.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,म-१, तहसिल कार्यालय, आष्टी, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, आष्टी, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---603--- दिनांक :-16/1/26---

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०५८९/२०२५**
**बोर्ड क्र.३२**

श्री. बबन आण्णा झांबरे, — अपिलार्थी
रा. हिंगणी, पो. टाकळसिंग, ता. आष्टी, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
महसूल-१, तहसिल कार्यालय, आष्टी, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, आष्टी, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.०८.२०२४ | सन २०२० ते २०२४ या कालावधीतील मौजे हिंगणी येथील जि.प.शाहावरील अतिक्रमण काढण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवालाच्या छायांकित प्रती व इतर मुद्याबाबत.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारे खोटी पत्रव्यवहार दिल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना परिपुर्ण माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, महसूल-१, तहसिल कार्यालय, आष्टी, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, आष्टी, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.- 604 दिनांक :- 16/1/26

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ११०५/२०२५**
**बोर्ड क्र.३३**

श्री.जिजाराम बाबु चौधरी, — अपिलार्थी
रा. हिंगणी, पो. टाकळसिंग, ता. आष्टी, जि. बीड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार, महसूल-१, तहसिल कार्यालय, आष्टी, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार, तहसिल कार्यालय, आष्टी, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१७.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.१२.२०२४ | दि.२४.०१.२०१२ व दि.०८.०६.२०२० या कालावधीतील स्तसिलदार साहेब तहसील कार्यालय आष्टी येथील आदेशक क्रमांक.२०१२/जमाअ-१/कावि/८४ दि.२४.०१.२०१२ रोजी व दि.१२.०१.२०२० चा आदेश, पंचनामासह संपूर्ण संचिका नक्कल मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारे खोटी पत्रव्यवहार दिल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना परिपुर्ण माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, महसूल-१, तहसिल कार्यालय, आष्टी, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, आष्टी, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 605 दिनांक : 16/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १५९७/२०२५ ते १६००/२०२५**
**बोर्ड क्र.३४ ते ३७ एकूण ०४ प्रकरणे**

श्री. अजित रामभाऊ जगताप, — अपिलार्थी
रा. सावलगाव, ता. माजलगांव, जि. बीड.
मो. नंबर-९४२३४७२९७३.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्राम महसूल अधिकारी,
कार्यालय माजलगांव, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
नायब तहसिलदार,
महसूल, तहसिल कार्यालय, माजलगांव, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये चार द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यांत आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/तपशिल |
|---|---|---|---|
| ३४ | १५९७/२०२५ | ०५.०८.२०२४ | मौजे सोन्नाथडी मधील आपल्या कार्यकाळात झालेले फेर नंबर ७२१७,१३०५,१३२३,१३२५,१३२८,१३२९,१३५९,१३६०,१३६९,१३७१,१३७५,१३७६,१३९३,१४००,१४०५,१४०९,१४१६,१४१७,१४१९ वरील फेर घेण्याकरिता दिलेले अर्ज व सदर वारसची सहमती व तलाठी डायरीला झालेली नोंद नक्कलच्या नोटीसची कार्यवाहीबाबत सर्व कागदपत्रे मिळणेबाबत. |
| ३५ | १५९८/२०२५ | ०५.०८.२०२४ | मौजे सुक्ष्मगांव मधील काही डिक्री आधार फेर नंबर ६२० चे सर्व कागदपत्रे मिळणेबाबत. |
| ३६ | १५९९/२०२५ | ०५.०८.२०२४ | मौजे गुजवडी मधील आपल्या कार्यालयात झालेले फेर नंबर ८०१, ८१०,७७७,७७२,८३२,८३३,८३७, ८४६, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ८४७,८५३,८६९,८७०,८७१,८९०,९१६,९२०, ९३२, ९३३, ९५३ वरील फेर घेण्याकरिता दिलेले अर्ज व सदर वारस प्रमाणपत्राची संमतीपत्र व तलाठी डायरीत असलेली नोंद व नमूना नंबर ५ च्या नोंदीची कार्यवाही बाबतचे सर्व कागदपत्रे मिळणेबाबत. |
| ३७ | १६००/२०२५ | ०५.०८.२०२४ | मौजे सुरुमगांव मधील आपल्या कार्यालयास आलेले फेर नंबर ५५८,५६०,६०९,६०८,६१२,६२०,६१९, ६७६, ६७७, ६८२,६८३ वरील फेर घेण्याकरिता दिलेले अर्ज व सदर वारस प्रमाणपत्राची सहमती पत्र व तलाठी डायरीत झालेली नोंद नमूना नंबर ५ च्या नोटीसची कार्यवाहीबाबत सर्व कागदपत्रे मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, कार्यालय स्थलांतर झाल्यामुळे माहितीचा शोध घेणे सुरु आहे. काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांना हवी असलेली माहिती देण्यात

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी, कार्यालय माजलगांव, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या चारही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. नायब तहसिलदार, महसूल, तहसिल कार्यालय, माजलगांव, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे चार द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---६०६--- दिनांक :-१६/१/२६---

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २१२३/२०२५**
**बोर्ड क्र.३८**

श्री. विजय ज्ञानोबा साळवे, अपिलार्थी
रा. फुले पिंपळगांव, ता. माजलगांव, जि.बीड-४३११४२.
मो. नंबर-९९२३९५०००६

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय माजलगांव, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय माजलगांव, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.०५.२०२५रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०७.०१.२०२५ | १. अपिलार्थी तथा वादी चक्रधर कठाळू पोटभरे यांनी अनुज प्रभाकर पोटभरे यांचे नावे शपथपत्र सादर करुन स्वत: स्वाक्षरी चक्रधर पोटभरे यांनी केली सदर शपथपत्र महाराष्ट्र शासनाच्या कोणत्या अध्यादेशात बसते/ येते. जे मा.अ.वि.अ.माजलगांव यांच्या सुनावणी प्राधिकरणाने स्विकारुन त्यावर निर्णय निकाल/ आदेश पारील केला त्या शपथपत्रासंदर्भातील महाराष्ट्र शासनाच्या अध्यादेशाच्या माहितीची साक्षांकित सत्यप्रत उपलब्ध करुन दयावी व इतर पाच मुद्याबाबत.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन

माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने त्यांना आवश्यक शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत दि.१६.०६.२०२५ रोजी कळविण्यात आले होते. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. सारांशाने, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---६५५--- दिनांक :---१६/१/२६---

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५१४८/२०२५**
**बोर्ड क्र.३९**

श्री. सय्यद मतिनपाशा जैनुद्दीन, — अपिलार्थी
रा. प्लॉट क्रमांक- १४, सर्वे क्रमांक-३६,
मयूर नगर-२, अंबड, ता. अंबड,
जि. जालना-४३१२०४,
मो. नंबर-९९२२८६२८८६

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
महसूल, तहसिल कार्यालय, माजलगांव, जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, माजलगांव, जि.बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.०८.२०२५ | दि.१२.०३.२०२४ ते सदर अर्ज आपणास प्राप्त दिनांक पर्यंत या कालावधीतील आपल्या कार्यालयात दाखल जन्म-मृत्मू-नोंद प्रकरणासंदर्भात सविस्तर माहिती मिळणेबाबत व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन

माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती आज रोजी अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत देखील आणलेली आहे. आपल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांना देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. तसेच आज रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आली व अपिलार्थी यांनी ती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्यासंदर्भात पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-----1607------ दिनांक :---16/1/26------

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०२९५/२०२५**
**बोर्ड क्र.४०**

श्री. विश्वनाथ भाऊराव मगर, — अपिलार्थी
रा. विश्वकमल निवास,
शाहुनगर, पांगरी रोड, बीड, ता.जि. बीड-४३११२२.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
महसूल, तहसिल कार्यालय, गेवराई, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार, तहसिल कार्यालय, गेवराई, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२१.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १४.०६.२०२५ | सन २०१२ ते ३१ मे २०२३ पर्यंत अर्जदार इंद्राबाई भाऊराव पटेकर रा. काठोडा ता. गेवराई, जि. बीड यांनी मी. काठोडा येथील जमीन सर्वे नं.६९ क्षेत्र ३० एकर ३१ गुठे क्षेत्रावर हैद्राबाद कुळ कायदयान्वये कलम ८ प्रमाणे धुम्या महार संरक्षित कुळ असल्याचे जाहीर करणे बाबत आज रोजी पर्यंत केलेल्या कार्यवाही व प्रकरण कोणत्या टप्यावर आहे त्याच्या निकालाच्या प्रती मिळणेबाबत व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अभिलेखात शोत घेतला असता आढळून आली नाही असे अपिलार्थी यांना दि.१८.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार महसूल-१, यांनी सदरील आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी माहिती उपलब्ध नसल्यास तसे अर्जदार यांना लेखी कळवावे, असा आदेश दि.१७.१०.२०२४ रोजी पारित केल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही या बाबीची आयोगाने गंभीर दखल घेतलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जानुसार आवश्यक असलेली माहिती सत्वर प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातून तहसिलदार, तहसिल कार्यालय, गेवराई, जि.बीड यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, गेवराई, जि.बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीचा कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन शोध घ्यावा. अशी कार्यवाही करताना रोजनामा ठेवण्यात येऊन दैनंदिन कामकाजाची नोंद त्यात घेण्यात यावी. या कार्यवाहीदरम्यान उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अशी कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात पूर्ण करावी व या कार्यवाहीचा अंतिम निष्कर्ष अपिलार्थी यांना कळविण्यात यावा.

२. वर नमूद केल्याप्रमाणे शोध घेऊन माहिती उपलब्ध न झाल्यास अशा माहिती संदर्भातील अभिलेख जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द **(अभिलेखाचा जतन कालावधी विचारात घेऊन)** तहसिलदार, तहसिल कार्यालय, गेवराई, जि.बीड यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार एफआयआर दाखल करावा, अशी त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.** 608 **दिनांक :** 16/1/26 **नोंदणीकृत टपालाद्वारे**

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०२३/२०२५ ते १०२८/२०२५**
**बोर्ड क्र.४९ ते ५४ एकूण ०६ प्रकरणे**

श्री. अनिल हरीभाऊ समुद्रे, अपिलार्थी
मु. पो. मिलींद नगर, पोलीस स्टेशन समोर,
अंबाजोगाई, जि. बीड-४३१५१७

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१०.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकूण सहा द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, श्री. हर्षवर्धन शामराव पगारे, पुरवठा लिपीक, तहसील कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ४९ | १०२३/२०२५ | ०१.०७.२०२४ | सन २०१५ ते आजतागायत पर्यंत या कालावधीतील अंबाजोगाई येथील सर्वे नं.३६० मधील नमूद जागा कोणाच्या मालकीचे असून नमूद जागतीक अंबाजोगाई तलाठी यांनी कोणकोणत्या व्यक्तीच्या नावांचे फेरफार करण्यात आले व्यक्तीचा नावांची यादी फेरफार नंबर सह माहिती मिळून तत्कालीन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कालावधीपासून ते आजतागायतपर्यंत तलाठी व गिदधावर यांच्या नावासह यादी मिळून वरील सर्वे नंबरचा नकाशा मिळणे या सर्वांची माहिती व इतर.. |
| ५० | १०२४/२०२५ | ०१.०७.२०२४ | अंबाजोगाई येथील सर्वे नं.१७ मधील आपल्या तहसिल कार्यालयाती नोंदी असल्याप्रमाणे वरिल सर्वे नंबरची जागा कोणाच्या मालकीची असून वरिल सर्वे नंबरचा जागेची फेरफारच्या नोंदी करणाऱ्या तलाठी व गिरधावरची नावांची यादी मिळूण सर्व कागदपत्राची झेरॉक्स साक्षांकित प्रती मिळणे |
| ५१ | १०२५/२०२५ | ०१.०७.२०२४ | अंबाजोगाई येथील सवे र नं.५८६ तत्कालीन जागा कोणाच्या मालकीची आहे. सदरील जागेमध्ये खरेदी-विक्री झाली असल्यास त्याचा फेरफार नंबर जुना/ नव्यासह माहिती मिळून वरिल नमूद सर्वे नंबर जागेमध्ये कोणकोणते शासकीय कार्यालय व इतर.. |
| ५२ | १०२६/२०२५ | ०१.०७.२०२४ | अंबाजोगाई तहसिल कार्यालया मधील सेक्शन जमा व बंदी-०१ फौज (मिल्ट्री ) यांच्या एकूण जागे मध्ये असलेल्या अंबाजोगाई शहरातील शासकीय व निम्न शासकीय कार्यालय २, शासकीय दवाखाणे, संस्था वस्तीगृह, महामंडळे, गृहनिर्माण सोसायटी, संस्था, शाळा महाविद्यालय, या सर्वांना अंबाजोगाई येथील तत्कालीन मा.तहसिलदार यांनी वरिल कार्यालयास अथवा विभागास देण्यात आलेल्या नोटीसचा प्रती व इतर.. |
| ५३ | १०२७/२०२५ | ०१.०७.२०२४ | अंबाजोगाई तहसिल कार्यालयामधील सेक्शन जमा व बंदी-१, व जमा व बंदी-२ कडे असलेल्या सर्वे नं.५८६ फोज-- फौज (मिल्ट्री) यांच्या एकूण जागेमध्ये असलेल्या अंबाजोगाई शहरातील शासकीय व निम्नशासकीय कार्यालय व इतर.. |
| ५४ | १०२८/२०२५ | ०१.०७.२०२४ | अंबाजोगाई तहसिल कार्यालयात असलेल्या जमा व बंदी-२ कडे असलेल्या जोगाईवाडी येथील योगेश्वरी औदयोगिक वसाहत संकीर्णची झेरॉक्स मिळून तसेच खालील इतर.. माहिती |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी विस्तूत स्वरुपाची माहिती मागितलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यात आली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे त्यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२४.०२.२०२६ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. तहसिलदार, तहसिल कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे सहा द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

सत्यमेव जयते

२६/१२/२०२५

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.** 18292 **दिनांक :** 26/12/2025 **नोंदणीकृत टपालाद्वारे**

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १८००/२०२५**
**बोर्ड क्र.४१**

श्री. शिवाजी रंगनाथ परदेशी,
मु. पो. सिरसमार्ग, ता. गेवराई, जि. बीड.
मो. नंबर-९१९२२७३७३७

अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार (महसूल-१),
तहसिल कार्यालय, गेवराई, जि. बीड

: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गेवराई, जि. बीड

: उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.०२.२०२५ | सन २००१ ते २००३ या कालावधीतील क्रमांक २००/जमाबंदी/कावी/५३३ तहसिल कार्यालय गेवराई दिनांक ११.०६.२००२ रोजी मा. तहसिलदार श्रीमती शोभा राऊत यांनी दिलेल्या आदेशाची नक्कल मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती संकलीत करुन आज रोजी सोबत आणलेली आहे. आपल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांना माहिती देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आली व अपिलार्थी यांनी ती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्यासंदर्भात पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---- 609 ---- दिनांक :- 16/1/26

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३६४०/२०२५**
**बोर्ड क्र.४२**

श्री. संदिप रामेश्वर आखरे, — अपिलार्थी
मु. पांढरी, पो. भोगलगाव, ता. गेवराई, जि. बीड.
मो. नंबर-९६६५४४८६७८

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्राम महसूल अधिकारी,
तलाठी सज्जा भोगलगाव, ता. गेवराई, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गेवराई, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, गेवराई, जि. बीड उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २७.०२.२०२५ | सन २०२३-२०२४ या कालावधीतील मौ. पांढरी पो. भोगलगांव ता.गेवराई, जि. बीड या गावाच्या पुर्ण शेतकऱ्यांचे यादी, त्यांना मिळालेली एकूण अनुदान रक्कम, शासनाची गावासाठी आलेली पुर्ण रक्कम यांची माहिती साक्षांकित प्रती सह मिळणेबाबत विनंती केली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी, भोगलगाव यांनी सदरील आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती

उपलब्ध करुन देण्यात यावी, असा दि.०५.०८.२०२५ रोजी निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही या बाबीची आयोगाने गंभीर दखल घेतलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी, तलाठी सज्जा भोगलगाव, ता. गेवराई, जि. बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार,तहसिल कार्यालय, गेवराई, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---610--- दिनांक :- 16/1/26

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४२११/२०२५**
**बोर्ड क्र.४३**

श्री. शंकर श्रीधर राऊत, — अपिलार्थी
रा. फ्लॅट नं.१०२, कृष्णारंग रेसीडेन्सी जगताप मंलग कार्यालयमागे काटे कॉलनी नंबर०१, पुणे आळंदी रोड, मु. चोविसवाडी, पो. चऱ्होली बु. ता. हवेली, जि. पुणे-४२२१०५.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार(महसूल-१),
तहसिल कार्यालय, गेवराई, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गेवराई, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.०६.२०२५ | दि.०१.०३.२०२५ ते दि.१२.०६.२०२५ या कालावधीतील मा.तहसीलदार साहेब, गेवराई हे वापरत असलेल्या वाहनाचे आर.सी.बुक व लॉगबुकची तपासणी करणे व त्याच्या साक्षांकित नक्कला मिळणे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी

केलेला माहितीचा अर्ज माझ्याकडे प्राप्त झालेला नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचा कार्यालयात शोधा घेऊन अपिलार्थी यांना माहिती देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल-१), तहसिल कार्यालय, गेवराई, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, गेवराई, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 611 दिनांक : 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०१७९/२०२५ व २१५३/२०२५**
**बोर्ड क्र.४४ व ४५**

श्री. जयराम दादाराव काळे, अपिलार्थी
रा. जाधव निवास जिजामाता चौक मोंढा रोड, बीड-४३११२२
मो. नंबर-९३१००९४९१३.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
महसूल-१ तहसिल कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,तहसिल कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१३.०१.२०२५ व दि.२९.०५.२०२५रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जाती विषय / तपशिल |
|---|---|---|---|
| ४४ | ०१७९/२०२५ | २६.०४.२०२४ | १९६५ साली स. नं.३४ सहयोगनगर, बीड मध्ये तहसीलदार यांचेकडे वायदा भरणा केलेली नक्कल देण्याबाबत अर्ज दिला दि.२२.०९.२०२३ ला अर्ज दिला आहे व इतर. |
| ४५ | २१५३/२०२५ | २५.०३.२०२५ | स. नं.३४ सहयोगनगर बीड प्लॉट नं.८ व ९ जागा २०X२० मीटर सुनावणी आपले न्यायालयात झाली आहे काय निकाल दिला ह्याबाबत लेखी कळवावे ही विनंती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अशी कोणतीही रक्कम वसूल केल्याचे अभिलेख आढळून आले नाही असे अपिलार्थी यांना दि.३०.१२.२०२४ रोजी प्रत्यक्ष दिलेली आहे. अपिलार्थी यांनी प्रत मिळाली असे नमूद करुन दि.०२.०१.२०२५ रोजी दिनांकित स्वाक्षरी केलेली आहे. तसेच दि.२०.०३.२०२४५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी दि.२७.०३.२०२५ रोजी प्रत मिळाली असे स्वाक्षरी केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपिलाचे उत्तर चुकची दिले आहे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांचे लेखी निवेदन आयोगाच्या पटलावर सादर केलेले आहे. सदर निवेदनाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद दिलेले आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांना अवलोकनाची संधी देऊन आवश्यक माहिती देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, महसूल-१ तहसिल कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या दोन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तहसिलदार,तहसिल कार्यालय, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.----612---------- दिनांक :---16/1/26---------

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २१५४/२०२५**
**बोर्ड क्र.४६**

श्री. जयराम दादाराव काळे, — अपिलार्थी
रा. जाधव निवास जिजामाता चौक मोंढा रोड, बीड-४३११२२
मो. नंबर-९३७००९४४९१३

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,+
महसूल-१, जिल्हाधिकारी कार्यालय,बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
महसूल-१, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२९.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०२.२०२५ | दि.२८.०१.२०२५ रोजी माझे निवेदन E टपाल क्र.E ४११७७८३ दि.६/२/२०२५ ना. अजित पवार साहेब पत्र क्र६३० दि.०६.०१.२०२५ स न ३४ प्लॉट नं. ८ व ९ जागा २० X२० मीटरची जागेवरील अतिक्रमण काढणेबाबत काय कार्यवाही केली व मंत्री महोदयाना अवगत केले आहे का. व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२८.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रत्यक्ष माहिती/ माहिची वस्तुस्थिती अवगत केलेली आहे. अपिलार्थी यांनी प्रत स्वीकारुन दिनांकित स्वाक्षरीत केलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०९.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार मह-२ (पामा-२) यांनी अर्जदारास त्यांनी मागणी केलेली माहितीशी संबंधित कागदपत्रांच्या छायांकित प्रती विहीत कालावधीत अर्जदार यांना पुरविल्या असल्याने अर्जदाराने देखील माहितीच्या प्रती मिळाल्याचे सुनावणी दरम्यान मान्य केल्याने अर्जदार यांना प्रस्तुत अपील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे, असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी लेखी निवेदन आयोगाच्या पटलावर सादर केलेले आहे. सदर निवेदनाचे अवलोकन केले असता माहिती अपुर्ण मिळाल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दि.०९.०६.२०२५ रोजीच्या उक्त नमूद निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.**- 613 **दिनांक :**- 16/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २७९७/२०२५**
**बोर्ड क्र.४७**

श्रीमती अनिता नितीन वानखडे, — अपिलार्थी
रा. रामनगर पैठण, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर.
मो.नंबर-९७६३०११९००

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०१.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०४.२०२५ | दि.०१.०८.२०२४ पासून ते आज पर्यंत या कालावधीतील उपरोक्त विषयान्वये संबंधित कालावधीमधील कामाच्या मानके नुसार तयार केलेली कामाची छायांकित प्रत देण्यात यावी.२ कामाची मानके केलेला तपासणी अहवालाची छायांकित प्रत देण्यात यावी तसेच या बाबतीचे नियम निकषाची शासन निर्णयाची प्रत देण्यात यावी.३ वरिष्ठ अधिकारी यांना मानके नुसार जो अहवाल सादर करण्यात आला ती सविस्तर माहिती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन

माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. तसेच माझे लेखी म्हणणे सादर केलेले आहे.

आज रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली आहे. तसेच अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणीसाठी दोन वेळेस नोटीस पाठविली तथापि अपिलार्थी दोन्ही वेळेस उपस्थित राहिले नाहीत. तदनंतर प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली आहे. जी माहिती संकेत स्थळावर प्रसिध्द आहे, अशी माहिती नव्याने प्रिंट काढून देणे अपेक्षित नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्या निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.** 614 **दिनांक :** 16/1/26

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४५६२/२०२५**
**बोर्ड क्र.४८**

श्री. सय्यद गुलजरिना मुशीरोद्दिन, — अपिलार्थी
रा. न्यू शाहेनशहा नगर, बीड,मो. नंबर ८६२४९५०९८७.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार, तहसिल कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या दि.२४.०७.२०२५ रोजीच्या माहिती अर्जाव्दारे हवी असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना व्यक्तिश: उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी प्राप्त करुन घेऊन दि.१६.९.२०२५ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी, बीड यांना उद्देशुन लेखी निवेदन दिलेले आहे. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी, माहिती मिळाली असल्याचे व मिळालेल्या माहिती कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, प्रथम अपिलीय अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद व अपिलार्थी यांचे लेखी निवेदन विचारात घेता, अपिलार्थी यांची विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 615 दिनांक : 16/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०७६९/२०२५ व ३६३४/२०२५**
**बोर्ड क्र.५५ व ५६**

श्री. वेदांत भागवराव शितोळे, — अपिलार्थी
रा. तट बोरगांव, ता. अंबाजोगाई, जि. बीड.
मो. नंबर-९४२३७६४२२२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१८.०२.२०२५ दि.०५.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी श्री. हर्षवर्धन शामराव पगारे, पुरवठा लिपिक, तहसिल कार्यालय, अंबाजोगई, जि. बीड उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ५५ | ०७६९/२०२५ | १९.०९.२०२४ | सन २००४ ते २०२४ या कालावधीतील अंबाजोगाई शहर व तालुक्यातील सर्व गावातील अधिकृत व अनाधिकृत मोबाईल टॉवर यादी देण्यात यावी. अधिकृत टॉवरची (NOC) नाहरकत प्रमाणपत्र व टॅक्स भरल्याची सर्व माहिती देण्यात यावी व इतर.. |
| ५६ | ३६३४/१२०२५ | १६.०४.२०२५ | सन २०२० ते २०२५ या कालावधीतील अंबाजोगाई शहर व तालुक्यातील सर्व गावातील अधिकृत व अनाधिकृत खडी मशीन व खदानच्या मालकाच्या नावासहित यादी देण्यात यावी व इतर.. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी विस्तृत माहितीची मागणी केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या दोन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२४.०२.२०२६ रोजी** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. तहसिलदार, तहसिल कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी) २।१३

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र. 18293 दिनांक : 26/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४५६०/२०२५ व ४५६१/२०२५**
**बोर्ड क्र.५७ व ५८**

श्रीमती सुमनबाई गोविंदराव रामदासी, — अपिलार्थी
रा. प्लॉट नं.०१, वैष्णवी रेसीडेन्सी, व्यंकटेश शाळेमागे
आदित्य नगर बीड, ता.जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, : उत्तरवादी क्र.१
महसूल-१, तहसिल कार्यालय, अंबाजोगाई,
ता. अंबाजोगाई, जि. बीड

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१.१
तलाठी सज्जा मांडवा, ता. अंबाजोगाई, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी पुरवठा लिपीक तहसिल कार्यालय, अंबाजोगाई उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ५७ | ४५६०/२०२५ | २५.०६.२०२५ | माझा सातबारा क्र.१७/३/७/१०(जूना) ०१/J/७/१०(नविन) या शेतजमीनिची चर्तु:सिमाची प्रत तात्काळ पुरविणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५८ | ४५६१/२०२५ | १८.०६.२०२५ | सातबारा वरिल गावात बदलाचे पुरावे माझ्या शेतीच्या सातबाऱ्या मध्ये इ.स.२०१४ पासून २०२० पर्यंत दोन वेळेत गावात बदल केले त्याची कारणे व संबंधीत आदेशाचे पुरावे सादर करणे व तात्काळ प्रत पाठविणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे तीन वेळेस सुनावणी रद्द केली तदनंतर चौथ्यावेळेस दि.२९.१०.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांना त्यांनी सादर केलेल्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात येवूनही अपिलार्थी हे सुनावणी करीता अनुपस्थित आहे त्यांना सदर प्रकरणात स्वारस्य असल्याचे दिसून येत नाही, प्रथम अपील निकाली काढण्यात येत आहे, असा निर्णय दि.२६.११.२०२५ रोजी पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांची बाजू ऐकून घेण्यासाठी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी चार वेळेस संधी दिल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दोन्ही उक्त नमूद निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे दोन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

**जा.क्र.**--------616-------- **दिनांक :**----16/1/26----

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २२७१/२०२५**
**बोर्ड क्र.५९**

श्री. नांदूरकर मुकुंद विश्वनाथराव , अपिलार्थी
मु. पो. नांदूरघाट, ता.केज, जि. बीड-४३११२६.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार सामान्य-२,
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
सर्वसाधारण, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.१२.२०२४ | देवस्थान इनाम जमीन वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये घेतल्याबाबत तत्कालीन उपजिल्हाधिकारी यांनी केलेल्या आदेशाची प्रत मिळणेबाबत. तसेच इ.स.२०१० पासून नांदूरघाट ता.केज, जि. बीड येथील सं.नं.३१४ या जमिनीच्या सातबारा मध्ये भोगवटादार वर्ग १ मध्ये घेतली त्याबाबत माहिती दयावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०२.०१.२०२५ रोजीच्यापत्रान्वये, अर्जात विशिष्ट अश्या संचिकाचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे आपण कोणत्या संचिकातील माहितीची मागणी करत आहेत हे ज्ञात होत नाही. तसेच अर्जात नांदुरघाट येथील स.नं.३१४ असे नमूद आहे, सर्व्हे नंबर/ सर्व्हे निहाय नुसार कुठल्याही प्रकारचा अभिलेख या संकलनाकडे ठेवला जात नाही, तसेच माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ मध्ये माहिती तयार करुन अर्जदार यांना देण्याची तरतुद नाही, असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना विहित वेळेत उत्तर कळविलेले आहे. या सर्व बाबींचा विचार करुन अपिलार्थी यांचे अपिल नामंजूर करण्यात येते, असा निर्णय दि.२४.०३.२०२५ रोजी पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिल अधिकारी यांचा आदेश मिळाला नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय योग्य दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या उक्त नमूद निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.: 617 दिनांक : 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २२७२/२०२५**
**बोर्ड क्र.६०**

श्री. नांदूरकर मुकूंद विश्वनाथराव , — अपिलार्थी
मु. पो. नांदूरघाट, ता.केज,
जि. बीड-४३११२६.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्राम महसूल अधिकारी,नांदुरघाट,
तहसिल कार्यालय, केज, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
सर्वसाधारण, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.१२.२०२४ | विठ्ठल रुक्मिणी देवस्थान नांदूरघाट स.नं.३१४ ही जमीन वर्ग एक मधून वर्ग दोन मध्ये घेतली दि.०१.०१.२०१९ पासून सोबतच्या ७/१२ उताऱ्यावर १२/७/१९ वर्ग एक आहे व नंतर दोन मध्ये आहे याबाबतची माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२१.०३.२०२५ रोजी व्यक्तिश: माहिती देण्याचा प्रयत्न केला असता अपिलार्थी यांनी माहिती घेण्यास नकार दिलेला आहे. त्याबाबीचा उपस्थित पंचासमक्ष दि.२२.०३.२०२५ रोजी पंचनामा करुन स्वाक्षऱ्या घेण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपील आदेश मिळाला नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तथापि अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन घेण्यास स्वारस्य दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र. 618 दिनांक : 16/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३८३८/२०२५ व ३८३९/२०२५**
**बोर्ड क्र.६१ व ६२**

अॅड. झेड. एस. काजी, — अपिलार्थी
रा. रॉयल कन्युनिकेशन बस स्थानक जवळ, मेन रोड, केज,
ता.केज, जि. बीड-४३११२३, मो. नंबर-८३२९२९६७६७

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (महसूल-१),
तहसिल कार्यालय, केज, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, केज, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१८.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ६१ | ३८३८/२०२५ | ०६.११.२०२४ | आपल्या कार्यालयातील TNC (कुळ) तथा ROR विभागातील संचिका क्रमांक १) २०१९/एम ए ए/१९८, २) २०१९/एम ए जी/२३४ सु नोंदी दखल बाबत दोन्ही संचित तहसल कार्यालय मार्फत करण्यात आले कारवाईचा संपूर्ण तपशील व संचिका देणे ROR/२००६/आर ओ आर/ कावी २०५ वि.तक्रारी फेर क्रं.५१८५ ची संपूर्ण संचिका प्रकरणात देण्यात आलेले आदेश व त्याची संपूर्ण संचिका कार्यालयीन नोंदी २ सत्यप्रती देणे. |
| /६२ | ३८३९/२०२५ | ०६.११.२०२४ | आपल्य कार्यालयातील TNC (कुळ) प्रकरणाचे संचिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | क्रमांक १)६७/T N C /१५-धोंडीबा वि. नसिब्बी, २) AR६/६६ शेख रहिम वि.भानुदास ७६/LND/२/ब्/६०, ३) भानुदास वि.शेख रहिम ४) नसिब्बी वि. मनहारोदीन ५) १४४/६२/AR/INAM भानुदास वि. नसिब्बी या प्रकरणातील अर्जदार गैरअर्जदार यांच्यामार्फत देण्यात आलेले कागदपत्र व इतर दस्तावेज तसेच आपल्या कार्यालयामार्फत या दोन्ही प्रकरणात देण्यात आलेले आदेश व त्याची संपूर्ण संचिका कार्यालयीन नोंदी २ सत्यप्रती देणे व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दोन्ही प्रथम अपिलावर दि.२२.०७.२०२५ व २१.०७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार महसूल-१ यांना देऊन कळविण्यात येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्यात यावी व त्याची एक प्रत या विभागास सादर करावी, असा निर्णय दिलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी कसल्याही प्रकारचे पालन करीत नसल्याने, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तु तप्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपील आदेशाचे पालन केलेले नाही. या बाबीची आयोगाने गंभीर दखल घेतलेली आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दोन्ही उक्त नमूद निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (महसूल-१),तहसिल कार्यालय, केज, जि. बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, केज, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.------619------ दिनांक :---16/1/26---

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४०३५/२०२५**
**बोर्ड क्र.६३**

अॅड. अशोक तुकाराम चाटे, — अपिलार्थी
मु. पो. तांबवा, ता.केज, जि. बीड.
मो. नंबर-९४०३७५७६७८

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
महसूल-१, तहसिल कार्यालय, केज, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, केज, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.०२.२०२५ | दि.०१.०४.२०२४ ते दि.३१.१२.२०२४ या कालावधीतील १. तहसिल कार्यालया मार्फत दिल्या गेलेल्या योजनेमध्ये रु.१००,२०० व ५००रु चे नोटरी केलेले दि.०१.०४.२०२४ ते दि.३१.१२.२०२४ पर्यंतचे सर्व बॉन्डचे प्रमाणित प्रती २. तहसिल कार्यालयाचे आवारातील टेबलस, छोटो अॅटो, व इतर यापैकी कोणा कोणास कार्यालयाचे अवारात बसण्याची परवानगी आहे याची नावासह माहिती ३. तहसिल कार्यालयाचे आवारातील टेबलस, अॅटो, बॉड विक्रेते व इतरांना कोणाचे आदेशान्वये अथवा कायदयाने बसवले आहे व त्यांच्याकडून तहसिल कार्यालयात किती रक्कम मिळते त्याचा तपशिल. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती लिखीत अभिलेख स्वरुपात उपलब्ध नाहीत. त्यामुळे अर्जदार यांना माहिती देणे शक्य नाही, असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०४.०६.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली. अर्जरदार यांनी मागणी केलेली माहितीचे लिखीत अभिलेख या कार्यालयास उपलब्ध नाहीत. त्यामुळे अर्जदार यांना माहिती देणे शक्य नाही असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती मोघम विस्तृत स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 620 दिनांक : 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४८४४/२०२५**
**बोर्ड क्र.६४**

श्री. आरेफ नामदार शेख, — अपिलार्थी
रा. अंबासाखर कारखाना वाघाळा,
ता. अंबाजोगाई, जि. बीड-४३१५२३,
मो. नंबर-९८९०८९११५३

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
महसूल-१, तहसिल कार्यालय, केज, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, केज, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (तथापि अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी स्वाक्षरीचा रोजनामा सादर केलेला नाही.)

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.०८.२०२४ | मौजे काळेगाव घाट येथील गट क्रमांक १०१/१, १०२/२,११९/२ मधील मुळमालक मुनीर बी भ्र जमाल यांचे नाव ७/१२ मधून कमी झालेबाबत व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत माहिती दिलेली

नाही. माहिती आढळून येत नाही असे लेखी दयावे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, जुने संचिकेचा शोध घेतला असता आढळून आले नाही. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२४.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी काळेगावघाट व अभिलेखपाल यांनी पुन्हा अभिलेखाची पडताळणी करुन अभिलेखे उपलब्ध असल्यस अपिलार्थी यांना माहिती देण्यात यावी, असे आदेश दिलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अद्यापही प्राप्त झाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अलिपार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या उक्त नमूद निर्णयात बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, महसूल-१, तहसिल कार्यालय, केज, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (वर नमूद केल्याप्रमाणे), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. तहसिलदार,तहसिल कार्यालय, केज, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 621 दिनांक : 16/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ००४९/२०२५**
**बोर्ड क्र.६५**

श्री. इसाकोद्दीन रियाजोद्दीन इनामदार, — अपिलार्थी
रा. सिरसाळा, ता. परळी (वै.), जि. बीड.
मो. नंबर-७०८३७०६८२६.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार,
महसूल-२, तहसिल कार्यालय, परळी वै. जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, परळी वै. जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व त्यांचे विधीज्ञ उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, नायब तहसिलदार, निवडणूक, परळी वै. उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १७.१०.२०२४ | स. नं.४१ गट क्रमांक ७१ मौजे गोवर्धन येथील इनामी जमिन आहे सरकार तर्फे लावणीवर देण्यात येत होती मूळ मालकाचे नाव अब्दुल मतान अब्दुल खालेक आहेम वलीयोद्दीन अहमद रियाजोद्दीन असे नाव आहे व इतर ... |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी व त्यांचे विधीज्ञ यांनी अवगत केले की, मला कोणतीच माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. नक्कल पुरविता येत नाही असे कळविण्यात आलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की,

अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आमच्याशी संबंधीत नूसन तलाठी सज्जा गोवर्धन (ही) मध्ये मागीतलेली माहिती विश्लेषणात्मक असून माहिती अधिकारी अधिनियम २००५ चे कलम २ च नुसार माहिती अधिकार कक्षात बसत नाही असे दि.०३.०४.२०२५ रोजीचे पत्र अपिलार्थी यांना देण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी पत्र स्वीकारुन दि.१५.०४.२०२५ रोजी पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ग्राम महसूल अधिकारी सजा गावर्धन, ता. परळी वै.जि. बीड या कार्यालयाशी संबंधित असल्याचे अवगत केलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित असल्यास असा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार जास्तीत जास्त पाच दिवसाच्या मुदतीत माहितीशी संबंधित कार्यालयाकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे कलम ६ (३) नुसार सुसंगत हस्तांतरण झाले नसल्यामुळे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना आता कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन अपिलार्थीस द्यावी लागेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, महसूल-२, तहसिल कार्यालय, परळी वै. जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद माहिती ज्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे ती त्या कार्यालयाकडुन अधिनियमातील कलम ५ (४) नुसार संकलित / एकत्रित करुन अशी माहिती अपिलार्थी यांना, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. तहसिलदार, तहसिल कार्यालय, परळी वै. जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र. 622 दिनांक : 16/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३९६५/२०२५**
**बोर्ड क्र.६६**

ॲड. माधव लिंबाजीराव जाधव, — अपिलार्थी
रा. प्रशांत नगर, बसस्टँडच्या मागे, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. मो. नंबर-९८२२०४२७७४

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नायब तहसिलदार (निवडणुक),
तहसिल कार्यालय, परळी वै., जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, परळी वै., जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२५.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.०४.२०२५ | २३३ परळी विधानसभा निवडणूक २०२४ संबंधी, १. परळी विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्रावरील फॉर्म नं.१७ सी च्या प्रती व इतर.. सात मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी

केलेली माहिती गोपनीय असल्यामुळे देता येत नाही, तसेच उर्वरीत माहिती पैकी म्हणजे जी माहिती देता येते ती मुद्दा क्र.८ ची माहिती त्यांना २१.०५.२०२५ रोजी पत्रान्वये देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, आवश्यक माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने देय होणारी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 623 दिनांक : 16/1/26

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०२९९, ३००, ३५४, ३५५ व १५५४/२०२५**
**बोर्ड क्र.६७ ते ७१ एकूण पाच प्रकरणे**

श्री. नखाते रमेश विष्णूपंत, — अपिलार्थी
रा. आवरगांव, ता. धारुर, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, धारुर, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, धारुर, जि.बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२१.०१.२०२५ (०२) दि.२३.०१.२०२५ (०२) दि.२२.०४.२०२५ (०१) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये पाच द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु.बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जाती विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ६७ | ०२९९/२०२५ | २६.११.२०२४ | सन जून २०२२त ते आजपर्यंत या कालावधीतील, KGBV मुलींचे वस्तीगृह टाईन-४ मधील कर्मचाऱ्यांची एकूण ०३ मुद्याबाबत माहिती मिळणेबाबत. |
| ६८ | ०३००/२०२५ | २१.११.२०२४ | जून २०२२त ते आजपर्यंत या कालावधीतील KGBV मुलींचे वस्तीगृह टाईन-४ मधील कर्मचाऱ्यांची एकूण ०४ मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६९ | ०३५४/२०२५ | २६.११.२०२४ | जून २०२२ ते आजपर्यंत या कालावधीतील KGBV मुलींचे वस्तीगृह टाईन-४ मधील कर्मचाऱ्यांची एकूण ०३ मुद्याबाबत माहिती मिळणेबाबत. |
| ७० | ०३५५/२०२५ | २१.११.२०२४ | जून २०२२ ते आजपर्यंत या कालावधीतील KGBV मुलींचे वस्तीगृह टाईन-४ मधील कर्मचाऱ्यांची एकूण ०३ मुद्याबाबत माहिती मिळणेबाबत. |
| ७१ | १५५४/२०२५ | ०९.१२.२०२४ | ०१ नोव्हेंबर २०२३ ते आजपर्यंत या कालावधीतील ग.शि.अ.कार्यालय धारुर येथे कार्यरत साधन व्यक्तींची तीन मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाची वैयक्ति माहिती मागितलेली असल्यामुळे, आपण मागणी केलेली माहिती देता येत नाही असे कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नसल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाची मोघम स्वरुपाची माहिती मागितलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलाथी यांनी विस्तृत व मोघम माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे पाच द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 629 दिनांक : 16/1/26

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १४५६/२०२५ व १७७७/२०२५**
**बोर्ड क्र.७२ व ७७**

श्री. संदिप अनंतराव पांचाळ, — अपिलार्थी
रा. आवरगांव, ता. धारुर,जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा आंबेवडगाव, ता. धारुर, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धारुर, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.०४.२०२५ व दि.०५.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, सहाय्यक प्रशासन अधिकारी, उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या दि.२९.०१.२०२५ रोजीच्या दोन माहिती अर्जाव्दारे हवी असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना व्यक्तिशः उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी प्राप्त करुन घेऊन दि.२०.०५.२०२५ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती धारुर यांना उद्देशुन लेखी निवेदन दिलेले आहे. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी, माहिती मिळाली असल्याचे व मिळालेल्या माहिती कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद व अपिलार्थी यांचे लेखी निवेदन विचारात घेता, अपिलार्थी यांची विचाराधिन दोनही व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपिलार्थी यांची दोन्ही व्दितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.----625---- दिनांक :--16/1/26--

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १४५७,१४५८/२०२५ व १७७६,१७७८ व १७७९/२०२५**

**बोर्ड क्र.७३,७४, ७६,७८ व ७९**

श्री. संदिप अनंतराव पांचाळ, — अपिलार्थी
रा. आवरगांव, ता. धारुर,जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, धारुर, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धारुर, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.०४.२०२५ (०२) व दि.०५.०५.२०२५ (०३) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये पाच द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, सहाय्यक प्रशासन अधिकारी, उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या दि.२७.०१.२०२५ व दि.२८.०१.२३०२५ रोजीच्या पाच माहिती अर्जाव्दारे हवी असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना व्यक्तिशः उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी प्राप्त करुन घेऊन दि.२०.०५.२०२५ व दि.१२.१२.२०२५ रोजी गट शिक्षाधिकारी, पंचायत समिती धारुर यांना उद्देशुन लेखी निवेदन दिलेले आहे. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी, माहिती मिळाली असल्याचे व मिळालेल्या माहिती कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद व अपिलार्थी यांचे लेखी निवेदन विचारात घेता, अपिलार्थी यांची विचाराधिन पाच व्दितीय अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपिलार्थी यांचे पाच व्दितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 625 दिनांक : 16/1/26

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक १४५९/२०२५**
**बोर्ड क्र.७५**

श्री. संदिप अनंतराव पांचाळ, — अपिलार्थी
रा. आवरगांव, ता. धारुर,जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
शिक्षण विभाग (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड,

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या दि.२८.०१.२०२५ रोजीच्या माहिती अर्जाव्दारे हवी असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना व्यक्तिशः उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी प्राप्त करुन घेऊन दि.२०.०५.२०२५ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती धारुर यांना उद्देशुन लेखी निवेदन दिलेले आहे. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी, माहिती मिळाली असल्याचे व मिळालेल्या माहिती कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद व अपिलार्थी यांचे लेखी निवेदन विचारात घेता, अपिलार्थी यांची विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपिलार्थी यांचे व्दितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी) २।।१

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

**जा.क्र.** ६२६ **दिनांक :** 16/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १८५१/२०२५**
**बोर्ड क्र.८०**

श्री. श्रीकृष्ण सोपान डापकर, — अपिलार्थी
रा.गांजापूर, ता. धारुर, जि. बीड-४३११२४,
मो. नंबर-९६०४१५०४०७

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
गांजपूर, ता. धारुर, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, धारुर, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०२.२०२५ | १. गांजपूर येथील घर नं.०१ ते २५ ची २००१ -२००२ च्या पी टी आर तसेच २०२४ ते २०२५ या कालावधीतील पी टी आर ची मागणी केलेली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि०९.०९.२०२५ रोजी व्यक्तिश: माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना देय होणारी माहिती दिलेली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---627--- दिनांक :---16/1/26---

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५०६४/२०२५**
**बोर्ड क्र.८१**

श्री. कपिल रामकिशन उजगरे,
रा. हिंगणी (खुर्द), ता.धारुर, जि. बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, हिंगणी (खुर्द), ता.धारुर, जि. बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, धारुर, जि. बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद्र सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार 'जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.०८.२०२५ | मौजे हिंगणी (खुर्द) या गावामध्ये जानेवारी २०२२ ते जून २०२५ या कालावधीमध्ये ग्रामपंचायत मार्फत कोणकोणती कामे करण्यात आली सदर कामाकरिता किती निधि आला व खर्च किती झाला व शिल्लक निधी किती त्या कामाच्या एम.बी. नक्कला कामाबाबत झालेले स्पॉट पंचनामा नक्कल मिळणे आवश्यक. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२५.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये पोस्टाने माहिती पाठविण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१४.१०.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०८.०८.२०२५ च्या माहिती अधिकाराच्या अर्जानुसार अपिलार्थी यांना माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ अन्वये संबंधितांना माहिती ०७ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याची व्यवस्था करण्यात यावी असे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना देय होणारी माहिती दिलेली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या ठिकाणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय योग्य दिसूनय येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---628--- दिनांक :---16/1/26---

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २६३५/२०२५**
**बोर्ड क्र.८२**

सौ. मंगल हिरभाऊ भराटे, — अपिलार्थी
रा. गणेश निवास कॅनाल रोड सुर्या लान्स मंगल कार्यालया शेजारी, शाहूनगर बीड-४३११२२.
मो. नंबर-६३०१५०६६७८

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
जिल्हा परिषद कार्यालय, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२६.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.१२.२०२४ | मस्टर पेमेंट व कुशन बील रक्कम १,४४,०००/- विलंबा बाबत पाहणी आदेश ,मजूरांची यादी विभागीय चौकशीबाबत व इतर.. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात दाखल केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा जिल्हा परिषद कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ

मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड, यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 629 दिनांक :- 16/1/26

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ११९८/२०२५**
**बोर्ड क्र.८३**

श्री. पोकळे प्रताप गणपत, — अपिलार्थी
रा. अंमळनेर, ता. पाटोदा, जि. बीड.
मो. नंबर-८३०८१८५९८५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, अंमळनेर, ता. पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, पाटोदा, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२१.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.१०.२०२४ | मा. अंमळनेर ग्रामपंचायत यांनी केलेल्या खालील चार विकास कामांच्या संपूर्ण माहिती संचिकेच्या प्रमाणीत प्रती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती संकलीत करुन आज रोजी त्यांना देण्याकरिता सोबत देखील आणलेली आहे. आपल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांना माहिती देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, आदेश देऊनही माहिती उपलब्ध करुन दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना कळविलेली आहे. तसेच आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आली व अपिलार्थी यांनी ती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्यासंदर्भात पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 630 दिनांक : 16/1/26

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २५७०/२०२५**
**बोर्ड क्र.८४**

श्री. प्रकाश पोपट खाडे, — अपिलार्थी
मु. पो. धनगर जवळका, ता. पाटोदा, जि. बीड-४१४२०४.
मो. नंबर-९१५८६३०१२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वरिष्ठ सहाय्यक,
पंचायत समिती, पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पाटोदा, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ऑनलाईन | दि.०१.०१.२०११ ते दि.१५.१०.२०२४ पर्यंत या कालावधीतील पंचायत समिती पाटोदा अंतर्गत माहिती अधिकार अंतर्गत खंडपी/ न्यायालय/ व इतर समकक्ष दंड विभागाने आदेशित केलेल्या सर्व प्रकारच्या दंडात्मक कारवाईच्या आदेशाची प्रत व संबंधिता विरुध्द आपल्याकडून करण्यात आलेल्या कारवाईची उपलब्ध माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आजरोजी संकलीत करुन त्यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आपल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांना देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. तसेच आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आली व अपिलार्थी यांनी ती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्यासंदर्भात पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र.------631------ दिनांक :------16/1/26------

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २५७१/२०२५**
**बोर्ड क्र.८५**

श्री. प्रकाश पोपट खाडे, — अपिलार्थी
मु. पो. धनगर जवळका, ता. पाटोदा, जि. बीड-४१४२०४.
मो. नंबर-९१५८६३०१२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
विस्तार अधिकारी (कृषि) तथा कक्ष प्रमुख मनरेगा,
पंचायत समिती, पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पाटोदा, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ऑनलाईन | दि.०१.०१.२०११ ते दि.१५.१०.२०२४ पर्यंत या कालावधीतील मनरेगा, नरेगा, रोजगार हमी योजनेअंतर्गत राबलेल्या सर्व प्रकारच्या सार्वजनिक कामाची उदा, खडीकरणा, पाणंद रस्ता, गावजोड रस्ता, पेविंग ब्लॉक, सार्वजनिक विहीर, ग्रामपंचायत बांधकाम इत्यादी पूर्ण अपूर्ण सार्वजनिक कामाच्या सध्यस्थितीची फोटो सहित माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत व मोठया कालावधीची माहिती मागितलेली आहे. तसेच बरीच माहिती ऑनलाईन

संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलाथी यांनी विस्तृत व मोघम माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 632 दिनांक :- 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४३०९/२०२५**
**बोर्ड क्र.८६**

श्री. पांडूरंग दादाराव नागरगोजे, मु. पो. रोहतवाडी, ता. पाटोदा,ि ज. बीड-४१४२०४.मो. नंबर-९४२००१९२७३ — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम, उपविभाग, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाटोदा, जि. बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१८.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या दि.१४.०७.२०२५ रोजीच्या माहिती अर्जाव्दारे हवी असलेली संपूर्ण माहिती त्यांना व्यक्तिशः उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी प्राप्त करुन घेऊन दि.११.१२.२०२५ रोजी उप अभियंता, जि.प.बांधकाम उप विभाग, पाटोदा यांना उद्देशुन लेखी निवेदन दिलेले आहे. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी, माहिती मिळाली असल्याचे व मिळालेल्या माहितीबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली जन माहिती अधिकारी यांच्याकडुन माहिती प्राप्त झाली असुन प्राप्त झालेल्या माहितीने समाधान झालेले आहे. त्यामुळे विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र.- 633 दिनांक :- 18/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४९००/२०२५**
**बोर्ड क्र.८७**

श्री. संदिप सभाकर बांगर, — अपिलार्थी
मु. पो. वाघोरा, ता. पाटोदा, जि. बीड-४१४२०४.
मो. नंबर-९३२२३४३४१६

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, वाघोरा, ता. पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, पाटोदा, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२९.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २१.०८.२०२५ | १५ व्या वित्त आयोगातून झालेल्या कामाचे अंदाजपत्रक प्रशासकीय आदेश, कार्यारंभ आदेश, टेस्ट रिपोर्ट, बील अदाकेलेले बँक स्टेटमेंट, जि.एस.टी. पावत्या सर्व झेरॉक्स प्रती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये व्यक्तिशः मागणी केलेली होती. तदंनतर अपिलार्थी यांनी माहितीसाठी कार्यालयात उपस्थित

राहिलेले नाहीत. त्यामुळे माहिती संकलीत करुन आज रोजी सोबत आणलेली आहे. आपल्या आदेशानुसार अपिलार्थी यांना माहिती देण्यात यईल.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती उपलब्ध न झालेबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आली व अपिलार्थी यांनी ती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्यासंदर्भात पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.** ६३५ **दिनांक :-** 16/1/26

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहितीआयोग,खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे,छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| **बोर्ड क्रं. ८८ ते ९५ एकूण ०८ प्रकरणे** | **द्वितीय अपील क्रं. ४३०१/२०२५ ते ४३०८/२०२५ एकूण ०८ प्रकरणे.** |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सुधाकर बळनाथ शिंदे,<br>मु. पो. वडवणी, ता. वडवणी, जि. बीड व<br>श्री. बाबुराव श्रीराम जेधे, मु. बाहेगव्हाण, ता. वडवणी, जि. बीड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| सु. बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्रं. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी | उत्तरवादी क्र.१ व २ | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| ८८ | ४३०१/२०२५ | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चिंचवण, ता. वडवणी, जि. बीड | उत्तरवादी क्र. १ | उपस्थित |
| | | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, वडवणी, जि. बीड | उत्तरवादी क्र. २ | उपस्थित |
| ८९ | ४३०२/२०२५ | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कडीवडगांव, ता. वडवणी, जि. बीड | उत्तरवादी क्र. १ | उपस्थित |
| | | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, वडवणी, जि. बीड | उत्तरवादी क्र. २ | उपस्थित |
| ९० | ४३०३/२०२५ | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, खडकी, ता. वडवणी, जि. बीड | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, वडवणी, जि. बीड | उत्तरवादी क्र.२ | उपस्थित |
| ९१ | ४३०४/२०२५ | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, उपळी, ता. वडवणी, जि. बीड | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, वडवणी, जि. बीड | उत्तरवादी क्र.२ | उपस्थित |
| ९२ | ४३०५/२०२५ | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सोन्नाखोटा, ता. वडवणी, जि. बीड | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, वडवणी, जि. बीड | उत्तरवादी क्र.२ | उपस्थित |
| ९३ | ४३०६/२०२४ | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, देवळा, ता. वडवणी, जि. बीड | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, वडवणी, जि. बीड | उत्तरवादी क्र.२ | उपस्थित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९४ | ४३०७/२०२५ | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कवडगांव, ता. वडवणी, जि. बीड | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, वडवणी, जि. बीड | उत्तरवादी क्र.२ | उपस्थित |
| ९५ | ४३०८/२०२५ | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, दुकडेवाडी, ता. वडवणी, जि. बीड | उत्तरवादी क्र.१ | उपस्थित |
| | | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, वडवणी, जि. बीड | उत्तरवादी क्र.२ | उपस्थित |

**( सुनावणीदिनांक १५.१२.२०२५ )**

अपिलार्थी यांनी दिनांक १८.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये एकूण ०८ द्वितीय अपिले दाखल केलेली आहेत. सदर द्वितीय अपिलांची एकत्रित सुनावणी दिनांक १५.१२.२०२५ रोजी घेण्यात आलेली आहे. तत्पुर्वी सुनावणीचा दिनांक व वेळ अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आला होता. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी सुनावणी दरम्यान उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. त्यानुसार आज रोजी, सुनावणीसाठी दोन्ही अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी वरीलप्रमाणे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये वेगवेगळया जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहितीची मागणी केलेली आहे.

| बोर्ड क्रं. | माहिती अर्ज दिनांक | कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील क्रं. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|---|---|
| ८८ | १६.०४.२०२५ | ४३०१/२०२५ | मार्च २०२२ ते आज पर्यंत या कालावधीतील पंधराव्या वित्त आयोगाची, एम आर ई जी एस (MREGS) अंतर्गतची सर्व कामे तसेच स्वच्छ भारत मिशन व दलित वस्ती अंतर्गतची सर्व कामे इत्यादी माहिती मिळावी. |
| ८९ | २८.०४.२०२५ | ४३०२/२०२५ | मार्च २०२२ ते आज पर्यंत या कालावधीतील पंधराव्या वित्त आयोगाची, एम आर ई जी एस (MREGS) अंतर्गतची सर्व कामे तसेच स्वच्छ भारत मिशन व दलित वस्ती अंतर्गतची सर्व कामे इत्यादी माहिती मिळावी. |
| ९० | २८.०४.२०२५ | ४३०३/२०२५ | मार्च २०२२ ते आज पर्यंत या कालावधीतील पंधराव्या वित्त आयोगाची, एम आर ई जी एस (MREGS) अंतर्गतची सर्व कामे तसेच स्वच्छ भारत मिशन व दलित वस्ती अंतर्गतची सर्व कामे इत्यादी माहिती मिळावी. |
| ९१ | २८.०४.२०२५ | ४३०४/२०२५ | मार्च २०२२ ते आज पर्यंत या कालावधीतील पंधराव्या वित्त आयोगाची, एम आर ई जी एस (MREGS) अंतर्गतची सर्व कामे तसेच स्वच्छ भारत मिशन व दलित वस्ती अंतर्गतची सर्व कामे इत्यादी माहिती मिळावी. |
| ९२ | २६.०४.२०२५ | ४३०५/२०२५ | मार्च २०२२ ते आज पर्यंत या कालावधीतील पंधराव्या वित्त आयोगाची, एम आर ई जी एस (MREGS) अंतर्गतची सर्व कामे तसेच स्वच्छ भारत मिशन व दलित वस्ती अंतर्गतची |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सर्व कामे इत्यादी माहिती मिळावी. |
| ९३ | २४.०४.२०२५ | ४३०६/२०२५ | मार्च २०२२ ते आज पर्यंत या कालावधीतील पंधराव्या वित्त आयोगाची, एम आर ई जी एस (MREGS) अंतर्गतची सर्व कामे तसेच स्वच्छ भारत मिशन व दलित वस्ती अंतर्गतची सर्व कामे इत्यादी माहिती मिळावी. |
| ९४ | १६.०४.२०२५ | ४३०७/२०२५ | मार्च २०२२ ते आज पर्यंत या कालावधीतील पंधराव्या वित्त आयोगाची, एम आर ई जी एस (MREGS) अंतर्गतची सर्व कामे तसेच स्वच्छ भारत मिशन व दलित वस्ती अंतर्गतची सर्व कामे इत्यादी माहिती मिळावी. |
| ९५ | २८.०४.२०२५ | ४३०८/२०२५ | मार्च २०२२ ते आज पर्यंत या कालावधीतील पंधराव्या वित्त आयोगाची, एम आर ई जी एस (MREGS) अंतर्गतची सर्व कामे तसेच स्वच्छ भारत मिशन व दलित वस्ती अंतर्गतची सर्व कामे इत्यादी माहिती मिळावी. |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी अवगत केले की, मला कोणत्याही प्रकरणात माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी वरीलप्रमाणे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी वेगवेगळया तारखेला एका स्वरुपाची सारखीच माहिती वेगवेगळया ग्रामपंचायतीकडे एकूण ०८ अर्ज दाखल केलेले आहेत. अपिलार्थी यांनी मागणी केलेली सर्व माहिती ऑनलाईन उपलब्ध आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान वरीलप्रमाणे उपस्थित प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी याच्या सर्व प्रथम अपिलावर वेळोवेळी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेले आहेत.

प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर झालेला युक्तीवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसुन येते की, अपिलार्थी यांनी एकाच विषयाची वेगवेगळया ग्रामपंचायतीकडे असे एकुण ०८ माहितीचे अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेले आहेत. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही ऑनलाईन उपलब्ध आहे. जी माहिती ऑनलाईन उपलब्ध आहे, ती माहिती प्रिंट काढून देणे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अपेक्षित नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे आठही द्वितीय अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे सर्व ०८ द्वितीय अपिले फेटाळण्यात येत आहेत.

प्र २।।६

**( प्रकाश इंदलकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जावक क्र./ 635 /दि. 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०४५६/२०२५ ते ०४५९/२०२५**
**बोर्ड क्र. ९६ ते ९९ एकूण ०४ प्रकरणे**

श्री. बद्रोद्दीन बाबुमियाँ शेख, — अपिलार्थी
रा. जुने रेल्वे स्टेशन, परळी वैजनाथ,
ता. परळी वैजनाथ, जि. बीड-४३१५१५,
मो. नंबर-८२०८८६३८९३

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, परळी वैजीनाथ, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, परळी वैजीनाथ, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२९.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये चार द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु.बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/तपशिल |
|---|---|---|---|
| ९६ | ०४५६/२०२५ | ३०.०९.२०२४ | जुना रेल्वे स्टेशनमध्ये होत असलेल्या शादी खान्याचा निधी किती आहे, कोणता आहे, त्यातून खर्च किती झाला, गुत्तेदाराला किती दिला व शिल्लक किती आहे याची सविस्तर माहिती देण्यात यावी. |
| ९७ | ०४५७/२०२५ | ३०.०९.२०२४ | सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ व २०२४-२५ या कालावधीमध्ये आपण जेट पंप बोअरच्य मोटारी नविन किती खरेदी केल्या व कोठे वापरण्यात आल्य याची सर्व माहिती देण्यात यावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९८ | ०४५८/२०२५ | ३०.०९.२०२४ | सर्वे नं.७५ मध्ये होत असलेल्या कब्रस्तानच्या शेडचा निधी किती आहे व किती खर्च झाला आणि गुत्तेदारास किती दिला आणि काम सध्या का बंद आहे याची सविस्तर माहिती देण्यात यावी. |
| ९९ | ०४५९/२०२५ | ३०.०९.२०२४ | यश कन्ट्रक्शन मार्फत इंडस्ट्रीज एरीयामध्ये होत असलेल्य कामाचे संपूर्ण वर्क ऑर्डर देण्यात यावे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणीही माहिती न मिळाल्याने असमाधानी, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असुन अशा माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दांच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. म्हणून ती अपिलार्थी यांना देय होणार नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे चार द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.-----636----- दिनांक :--16/1/26--

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३६३१/२०२५**
**बोर्ड क्र.१००**

श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, — अपिलार्थी
रा. गांधी मार्केट सटेशन रोड, परळी वैजनाथ छत्रपती निवास
धुमाळ ज्वेलर्सच्या बाजूला, ता. परळी वैजनाथ, जि. बीड.
मो. नंबर-९१११२८७१२१२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, परळी वैजीनाथ, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, परळी वैजीनाथ, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०१.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०४.२०१४ | दि.०१.०१.१९६५ ते सन ३१ डिसेंबर २००० या कालावधीतील नगर परिषद परळी वैजनाथ येथील वरील कालावधीत परळी नगर परिषद या ठिकाणी मुख्याधिकारी या पदावर शासकीय कामकाज केलेल्या मुख्याधिकारी अधिकाऱ्याची माहिती नाव हुदा साहित्य व केलेल्या कार्यकालाची संपूर्ण माहिती व कार्यकालाचा कालावधी याची संपूर्ण माहिती डिटेल सह देण्यात यावी व इतर .. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अद्यापपर्यंत माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलाथी यांनी विस्तृत व मोघम

माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

प्र २११६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.**------639------ **दिनांक :**---16/1/26---

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४६९१/२०२५**
**बोर्ड क्र.१०१**

श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, — अपिलार्थी
रा. गांधी मार्केट स्टेशन रोड परळी वैजनाथ छत्रपती निवास
धुमाळ ज्वेलर्स बाजूला मुक्काम पोस्ट परळी,
ता. परळी वैजनाथ, जि. बीड.
मो. नंबर-९११२८७१२१२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, परळी वैजनाथ, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय, परळी वैजनाथ, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१३.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०५.२०२५ | भक्ती एंटरप्रायजेस आणि परळी नगर परिषद प्रकरण भक्ती एंटरप्रायजेस व परळी नगर परिषद यांनी सन ०१.०१.२०२० ते ते आजतागायत केलेल्या काकाची संपूर्ण माहिती व जिआर सोबत केलेल्या कामाची माहिती व ऑडिट व किर्द नोंदी सह माहिती देण्यात यावी व इतर.. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागितलेली माहिती अद्यापपर्यंत दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, परळी वैजनाथ, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद, परळी वैजनाथ, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 638 दिनांक : 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०३९६४/२०२५**
**बोर्ड क्र.१०२**

श्री. उमाकांत तुकाराम गायकवाड,
रा. इंदिरा नगर, ता. परळी वै, जि. बीड.
मो. नंबर-९०२८१००६६२ — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
नाव नोंदणी विभाग, नगर परिषद कार्यालय, परळी वैजनाथ,
जि. बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, परळी वैजनाथ, जि. बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२५.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.०५.२०२५ | मी आपल्या नगर परिषदेच्या माहितीनुसार सर्वे ४९ मधील ११.२५ हेक्टर ही जागा बागबगीचेसाठी आरक्षीत आहे. तरी माझे स्वत:चे नाव नोंदणी मालकीसाठी (PTR)२०१७ मध्ये नोंद झाली असून, इतर लोकांचे सुध्द (PTR) ला नोद झाली आहे तरी आम्हाला सर्वाचे नावे कोणत्या अहवालानुसार नोंद झाली याची माहिती देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला अर्धवट माहिती दिलेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अर्धवट माहिती मिळाली, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अर्धवट माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२०.०८.२०२५ रोजी माहिती दिलेली आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 639 दिनांक :- 16/1/26

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४०३७/२०२५**
**बोर्ड क्र. १०३**

श्री. सोमेश्वर वैजनाथराव जुजगर, — अपिलार्थी
रा. जुजगर गल्ली, माजलगांव,
मु. पो. ता. माजलगांव, जि. बीड.
मो. नंबर-८४२१७७२१५९

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, माजलांव, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, माजलांव, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.०६.२०२५ | जुना वार्ड नं.०६ नवा वार्ड न.९ पी. टी. आर. नगर परिषद परळी येथे घर नं.२५० गंगाबाई विष्णूराव जुजनग यांचे कशा आधारे नाव लावले यांची सविस्तर माहिती मिळावी सर्व कागदपत्रे साहित्य पि.टी.आर ला नाव कशा आधारे लावण्यात आला. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी व त्यांच्या प्रतिनिधी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी विलंबानी माहिती दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी विलंबाने

माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी व त्यांच्या प्रतिनिधी यांच्या युक्तिवाद विचारात घेता, अपिलार्थी यांना विलंबाने माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 640 दिनांक : 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २२८९/२०२५**
**बोर्ड क्र.१०४**

श्री. मोबीन हमीद शेख, — अपिलार्थी
मु. पो. क्रांतीनगरर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
कनिष्ठ अभियंता पाणी पुरवठा,
नगर पंचायत कार्यालय, पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर पंचायत, पाटोदा, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.०२.२०२५ | पाटोदा नगर पंचायत अंतर्गत वार्ड क्र.१५,१६,१७ अंतर्गत २०२३-२०२४-२०२५ अंडरग्राउंड नाली व रस्ता या संदर्भाने खालील १. सदर कामाचे टी एस व प्रशासकीय मंजूरी २. सदर कामाचे इस्टीमेंट वर्क ऑर्डर,मोजमाप पुस्तिका थर्ड पार्टी ऑडिट व दिल्या गेलेल्या पेमेंटची माहिती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०८.१२.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांनी मागणी केलेली माहिती देणेसाठी अपिलार्थी यांना विहीत कालावधीत कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखाचे अवलोकन करण्याची एक संधी दयावी व अपिलार्थी यांनी

मागणी केलेली माहिती उपलब्ध असल्यास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देण्यात यावी असा आदेश दिलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्यचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, कनिष्ठ अभियंता, पाणी पुरवठा, नगर पंचायत कार्यालय, पाटोदा, जि. बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी,नगर पंचायत, पाटोदा, जि. बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 641 दिनांक :- 16/1/26

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५१७१/२०२५ ते ५१८७/२०२५**
**बोर्ड क्र. १०५ ते १२१ एकूण १७ प्रकरणे**

श्री. शिवभुषण लक्ष्मणराव जाधव, अपिलार्थी
रा. पाटील गल्ली पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, कनिष्ठ अभियंता, पाणी पुरवठा, नगर पंचायत कार्यालय, पाटोदा, जि. बीड : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर पंचायत, पाटोदा, जि. बीड : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१२.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये सतरा द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| सु. बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपीली क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| १०५ | ५१७१/२०२५ | १३.०६.२०२५ | नगर पंचायत पाटोदा वैशिष्ट्यपुर्ण योजनेतून दि.२७.०४.२०२१ रोजी पाणीपुरवठा विस्तारित योजना दिलेली रक्मकम ८,५०,८५०/- संदर्भाने खलीलप्रमाणे ०८ मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. १. सर्वसाधारण माहिती २. अंजदाजपत्रक नकाशासह ३. तांत्रिक मान्यता ४. प्रशासकीय मान्यता ५. कार्यारंभ आदेश ६. थर्ड पार्टी ऑडीट रिपोर्ट ७. कामाची मोजमाप पुस्तिका व दिल्या गेलेल्या पेमेंटची माहिती ८. वरील योजनेसाठी खरेदी केलेल्या साहित्य स्टॉक रजिस्टर नोंद. |
| १०६ | ५१७२/२०२५ | १३.०६.२०२५ | नगर पंचायत पाटोदा वैशिष्ट्यपुर्ण योजनेतून दि.१८.१०.०२४ रोजी जगदंबा मजूर संस्था, वार्षिक देखभाल दुरुस्ती साठी ४,५६,२३६/- संदर्भाने खलीलप्रमाणे ०८ मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. १. सर्वसाधारण माहिती २. अंजदाजपत्रक नकाशासह ३. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | तांत्रिक मान्यता ४. प्रशासकीय मान्यता ५. कार्यारंभ आदेश ६. थर्ड पार्टी ऑडीट रिपोर्ट ७. कामाची मोजमाप पुस्तिका व दिल्या गेलेल्या पेमेंटची माहिती ८. वरील योजनेसाठी खरेदी केलेल्या साहित्य स्टॉक रजिस्टर नोंद. |
| १०७ | ५१७३/२०२५ | १३.०६.२०२५ | नगर पंचायत पाटोदा दि.१२.१०.२०२० रोजी साबीर कन्स्ट्रक्षण पाणीपुरवठा पाईपलाईन ४,३५,१३०/- संदर्भाने खलीलप्रमाणे ०८ मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. १. सर्वसाधारण सभा ठराव २. अंजदाजपत्रक नकाशासह ३. तांत्रिक मान्यता ४. प्रशासकीय मान्यता ५. कार्यारंभ आदेश ६. थर्ड पार्टी ऑडीट रिपोर्ट ७. कामाची मोजमाप पुस्तिका व दिल्या गेलेल्या पेमेंटची माहिती ८. वरील योजनेसाठी खरेदी केलेल्या साहित्य स्टॉक रजिस्टर नोंद. |
| १०८ | ५१७४/२०२५ | १३.०६.२०२५ | नगर पंचायत पाटोदा वैशिष्टयपुर्ण योजनेतून दि.१९.०८.२०२० रोजी आलीया कन्स्ट्रक्षण पाणीपुरवठा पाईलपाईलन रक्कमी ४,४९,६३७/- तसेच दि.२९.०९.२०२० रक्कम १,९२,७०१/- संदर्भाने खलीलप्रमाणे ०८ मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. १. सर्वसाधारण सभा ठराव २. अंजदाजपत्रक नकाशासह ३. तांत्रिक मान्यता ४. प्रशासकीय मान्यता ५. कार्यारंभ आदेश ६. थर्ड पार्टी ऑडीट रिपोर्ट ७. कामाची मोजमाप पुस्तिका व दिल्या गेलेल्या पेमेंटची माहिती ८. वरील योजनेसाठी खरेदी केलेल्या साहित्य स्टॉक रजिस्टर नोंद. |
| १०९ | ५१७५/२०२५ | १३.०६.२०२५ | नगर पंचायत पाटोदा सन २०१६ ते २०१८ दरम्यान वैयक्तिक शौचालयासाठी अनुदान दिलेल्या लाभार्थ्यांची यादी व दिल्या गेलेल्या पेमेंटची माहिती तसेच सदर लाभासाठी नगर पंचायत पाटोदाकडे लाभार्थ्यांनी दाखल केलेल्या अर्जाची प्रस्तावाची झेरॉक्स प्रती. |
| ११० | ५१७६/२०२५ | १३.०६.२०२५ | नगर पंचायत पाटोदा दि.१४.०८.२०२० रोजी विजय कचरु मते रक्कम ४,७९,५६९/- कॅनॉल गाळ काढणे संदर्भाने खलीलप्रमाणे ०८ मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. १. सर्वसाधारण सभा ठराव २. अंजदाजपत्रक नकाशासह ३. तांत्रिक मान्यता ४. प्रशासकीय मान्यता ५. कार्यारंभ आदेश ६. थर्ड पार्टी ऑडीट रिपोर्ट ७. कामाची मोजमाप पुस्तिका व दिल्या गेलेल्या पेमेंटची माहिती ८. वरील योजनेसाठी खरेदी केलेल्या साहित्य स्टॉक रजिस्टर नोंद. |
| १११ | ५१७७/२०२५ | १३.०६.२०२५ | नगर पंचायत पाटोदा दि.२४.०२.२०२३ ची प्रशासकीय मान्यता एकूण २,९९,४९७/- (क्रमांक ३१४, ३१६, ३१५,३२१) वॉटर सप्लाय योजनेसंदर्भाने खलीलप्रमाणे ०८ मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. १. सर्वसाधारण सभा ठराव २. अंजदाजपत्रक नकाशासह ३. तांत्रिक मान्यता ४. प्रशासकीय मान्यता ५. कार्यारंभ आदेश ६. थर्ड पार्टी ऑडीट रिपोर्ट ७. कामाची मोजमाप पुस्तिका व दिल्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | गेलेल्या पेमेंटची माहिती ८. प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्याकडे पाठविलेलया प्रस्तावाची झेरॉक्स प्रत. |
| ११२ | ५१७८/२०२५ | १३.०६.२०२५ | नगर पंचायत पाटोदा दि.२३.०७.२०१९ ची प्रशासकीय मान्यता एकूण ९,३४,४००/- मुस्लीम मोहल्ला पाईपलाईन संदर्भाने खलीलप्रमाणे ०८ मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. १. सर्वसाधारण सभा ठराव २. अंजदाजपत्रक नकाशासह ३. तांत्रिक मान्यता ४. प्रशासकीय मान्यता ५. कार्यारंभ आदेश ६. थर्ड पार्टी ऑडीट रिपोर्ट ७. कामाची मोजमाप पुस्तिका व दिल्या गेलेल्या पेमेंटची माहिती ८. प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्याकडे पाठविलेलया प्रस्तावाची झेरॉक्स प्रत. |
| ११३ | ५१७९/२०२५ | १३.०६.२०२५ | नगर पंचायत पाटोदा दि.२०.०५.२०२१ रोजी देखाभाल दुरुस्तीसाठी दिली गेलेली रक्कम ३,५९,३२४/- (व्हाउचर नं.५२४९५७/१०) सदर्भाने खालील ०८ मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. १. सर्वसाधारण सभा ठराव २. अंजदाजपत्रक नकाशासह ३. तांत्रिक मान्यता ४. प्रशासकीय मान्यता ५. कार्यारंभ आदेश ६. थर्ड पार्टी ऑडीट रिपोर्ट ७. कामाची मोजमाप पुस्तिका व दिल्या गेलेल्या पेमेंटची माहिती ८. प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्याकडे पाठविलेलया प्रस्तावाची झेरॉक्स प्रत. |
| ११४ | ५१८०/२०२५ | १३.०६.२०२५ | नगर पंचायत पाटोदख्क्ष वॉटर सप्लाय स्कीम प्रशासकीय मान्यता दि.२१.०५.२०२० अमाउंट १,२४,०७,९७६/- संदर्भान खालील प्रमाणे ०८ मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. १. सर्वसाधारण सभा ठराव २. अंजदाजपत्रक नकाशासह ३. तांत्रिक मान्यता ४. प्रशासकीय मान्यता ५. कार्यारंभ आदेश ६. थर्ड पार्टी ऑडीट रिपोर्ट ७. कामाची मोजमाप पुस्तिका व दिल्या गेलेल्या पेमेंटची माहिती ८. प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्याकडे पाठविलेलया प्रस्तावाची झेरॉक्स प्रत. |
| ११५ | ५१८१/२०२५ | १३.०६.२०२५ | नगर पंचायत पाटोदा दि.०७.०९.२०२० रोजी प्रशासकीय मान्यता जयसिंगनगर पाणी पुरवठा वितरण व्यवस्था रक्कम २,९६,४३०/- सदर्भाने खालील ०८ मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. १. सर्वसाधारण सभा ठराव २. अंजदाजपत्रक नकाशासह ३. तांत्रिक मान्यता ४. प्रशासकीय मान्यता ५. कार्यारंभ आदेश ६. थर्ड पार्टी ऑडीट रिपोर्ट ७. कामाची मोजमाप पुस्तिका व दिल्या गेलेल्या पेमेंटची माहिती ८. प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्याकडे पाठविलेलया प्रस्तावाची झेरॉक्स प्रत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ११६ | ५१८२/२०२५ | १३.०६.२०२५ | नगर पंचायत पाटोदा दि.१२.०५.२०२० रोजी प्रशासकीय मान्यता कॅनॉल स्वच्छता ९,८८,४८१/- रु. संदर्भाने खालील प्रमाणे ०८ मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. १. सर्वसाधारण सभा ठराव २. अंजदाजपत्रक नकाशासह ३. तांत्रिक मान्यता ४. प्रशासकीय मान्यता ५. कार्यारंभ आदेश ६. थर्ड पार्टी ऑडीट रिपोर्ट ७. कामाची मोजमाप पुस्तिका व दिल्या गेलेल्या पेमेंटची माहिती ८. प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्याकडे पाठविलेलया प्रस्तावाची झेरॉक्स प्रत. |
| ११७ | ५१८३/२०२५ | १३.०६.२०२५ | नगर पंचायत पाटोदा पाणी पुरवठा योजनेची वार्षिक देखभाल, वॉल बसवणे, मोटार पंप बसवणे रक्कम रु.१४,२५,२००/- मार्च २०२० सदंर्भात खालील ०८ मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. १. सर्वसाधारण सभा ठराव २. अंजदाजपत्रक नकाशासह ३. तांत्रिक मान्यता ४. प्रशासकीय मान्यता ५. कार्यारंभ आदेश ६. थर्ड पार्टी ऑडीट रिपोर्ट ७. कामाची मोजमाप पुस्तिका व दिल्या गेलेल्या पेमेंटची माहिती ८. प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्याकडे पाठविलेलया प्रस्तावाची झेरॉक्स प्रत. सदर कामासाठी खरेदी केलेल्या साहित्यांची स्टॉक रजिस्टर नोंद प्रत. |
| ११८ | ५१८४/२०२५ | १३.०६.२०२५ | नगर पंचायत पाटोदा प्रशासकीय मान्यता दि.१८.०३.२०२१ रक्कम २७,१५,०००/- एक्सटेंशन ऑफ पाईपलाईन संदर्भाने खालील ०८ मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. १. सर्वसाधारण सभा ठराव २. अंजदाजपत्रक नकाशासह ३. तांत्रिक मान्यता ४. प्रशासकीय मान्यता ५. कार्यारंभ आदेश ६. थर्ड पार्टी ऑडीट रिपोर्ट ७. कामाची मोजमाप पुस्तिका व दिल्या गेलेल्या पेमेंटची माहिती ८. प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्याकडे पाठविलेलया प्रस्तावाची झेरॉक्स प्रत. |
| ११९ | ५१८५/२०२५ | १३.०६.२०२५ | नगर पंचायत पाटोदा अंतर्गत मार्च २०२२ ते मे २०२५ पर्यंत सर्व खात्याच्या कीर्द व बँक अकाऊटची स्टेटमेंट |
| १२० | ५१८६/२०२५ | १३.०६.२०२५ | लांजेश्वर ईट पाणीपुरवठा योजना (अंदाजे ८५ कोटी ) योजने संदर्भाने खालील ०७ मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. १. सदर पाणी पुरवठा योजने संदर्भाने नगर पंचायत पाटोदा घेतलेल्या सर्वसाधारण सभेचा ठराव व इतर.. |
| १२१ | ५१८७/२०२५ | १३.०६.२०२५ | नगर पंचायत पाटोदा यांनी दि.१४.०९.२०१८ प्रशासकीय मान्यता १६,४३,८००/- रु. पाईपलाईन योजना संदर्भाने खालील ०७ मुद्याबाबत माहिती मागितलेली आहे. १. सर्वसाधारण सभा ठराव २. अंजदाजपत्रक नकाशासह ३. तांत्रिक मान्यता ४. प्रशासकीय मान्यता ५. कार्यारंभ आदेश ६. थर्ड पार्टी ऑडीट रिपोर्ट ७. कामाची मोजमाप |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पुस्तिका व दिल्या गेलेल्या पेमेंटची माहिती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती पैकी एकाही प्रकरणात अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांनी काही प्रकरणात माहिती केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे अवलोकन करावे असे कळविण्यात आले होते. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे काही प्रकरणात माहिती संकलीत करुन सोबत आणलेली आहे. आपल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांना माहिती देण्यात येईल.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अगवत केले की, अपिलार्थी यांच्या सतरा प्रथम अपिलावर दि.०९.१२.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांनी मागणी केलेली माहिती देणेसाठी अपिलार्थी यांना विहीत कालावधीत कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखाचे अवलोकन करण्याची एक संधी द्यावी व अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध असल्यास ती माहिती अधिकार अधिनियम तरतुदीनुसार दयावी असा आदेश पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, विहित मुदतीत माहिती देण्यास नकार, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर पंचायत कार्यालय, पाटोदा, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या सतरा जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली **प्रति अर्ज** ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.
२. मुख्याधिकारी,नगर पंचायत, पाटोदा, जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे सतरा द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.----642---------- दिनांक :--16/1/26-----

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ००९८/२०२५**
**बोर्ड क्र.१२२**

श्री. मजरखान रसुलखान पठाण, — अपिलार्थी
रा. अंबावेस मुजावर वाडा, परळी वैजनाथ, जि. बीड.
मो. नंबर-९९७०६०२६४४

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर पंचायत कार्यालय, पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर पंचायत, पाटोदा, जि. बीड

**(सुनावणी दिनांक १५.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०७.२०२४ | महाराष्ट्र गुंठेवारी विकास प्रमाणपत्र वर्षे २०२२२-२०२३ या कालावधीतील एकूण चार मुद्याबाबत.. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली मोघम व विस्तृत स्वरुपाची मागितेली आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत

नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. या प्रकरणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्य व इतर सिव्हिल अपील नं.४६५४/२०११ या निर्णयाकडे सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे सहा द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

**जा.क्र.** 643 **दिनांक :** 16/1/26